शुक्रवार, 26 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 29
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 26 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-29 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# कशाच्या आधारावर गुन्हेगारांना सोडले ?

## सर्वोच्च न्यायालयाची गुजरात सरकारला नोटीस !

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गोध्रा हत्याकांड आणि त्यानंतर गुजरातमध्ये उसळलेल्या हिंसाचार आणि दंगलींमध्ये शेकडो कुटुंबांची वाताहत झाली. अशा अनेक प्रकरणांची सुनावणी न्यायालयांमध्ये झाली असून अनेक प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. असाच एक खटला म्हणजे बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील असून या प्रकरणात आरोपींना जन्मठेपेची शिक्षादेखील सुनावण्यात आली होती. मात्र, काही दिवसांपूर्वीच या आरोपींची मुदतपूर्व सुटका करण्यात आली आहे. या मुद्द्यावरून देशातले वातावरण तापले आहे. गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात तीन याचिका दाखल करण्यात आल्या असून त्यासंदर्भात आता सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला नोटीस बजावली आहे. कोणत्या आधारावर या आरोपींची सुटका केली? यासंदर्भात न्यायालयाकडून विचारणा करण्यात आली आहे.**

**सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल**

गुजरात सरकारच्या या निर्णयाला विरोध करणाऱ्या एकूण तीन याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. यामध्ये माकपच्या नेत्या सुभाषिणी अली, तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा आणि इतर एका याचिकाकर्त्याचा समावेश आहे. ११ गुन्हेगारांची सुटका करण्याच्या गुजरात सरकारच्या निर्णयावर आक्षेप घेत हा निर्णय मागे घेण्यात यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

**न्यायालयाचे आदेश**

सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या याचिकांची सुनावणी सुरू आहे. या सगळ्या प्रकरणात प्रश्न हा आहे की गुजरात सरकारच्या कायद्यामध्ये गुन्हेगारांची अशा प्रकारे मुदतपूर्व सुटका करण्याची तरतूद आहे किंवा नाही?



आम्हाला हे देखील बघावे लागेल की या गुन्हेगारांची सुटका करताना प्रकरणाचा एकूणच सखोल विचार केला गेला आहे की नाही, असे न्यायालयाने नमूद केले. याशिवाय, सुटका करण्यात आलेल्या ११ आरोपींना देखील या प्रकरणात याचिकांमध्ये प्रतिवादी करण्यात यावे, असे निर्देश न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले आहेत.

**नेमके काय आहे प्रकरण?**


गोध्रा हत्याकांडानंतर २००२ साली गुजरात दंगलींदरम्यान घडलेल्या बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेल्या ११ आरोपींची कारागृहातून सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला. त्याचाच भाग म्हणून स्वातंत्र्यदिनी गोध्रा उप-कारागृहातून हे ११ दोषसिद्ध आरोपी बाहेर पडले. गुजरातमधील विरोधी पक्ष आणि विशेषतः मानवाधिकारासाठी लढणाऱ्या संस्थांकडून गुजरात सरकारच्या निर्णयाबाबत संताप व्यक्त केला जात आहे. तर यापेक्षा कमी गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील आरोपी कारागृहांत खितपत पडलेले असताना या प्रकरणातील आरोपींची मुदतपूर्व सुटका करण्यात आल्याने गुजरात सरकारच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**दोन आठवड्यांनी होणार सुनावणी**

दरम्यान, गुजरात सरकारला नोटीस बजावण्यात आली असून दोन आठवड्यांनंतर या प्रकरणाची सुनावणी होईल, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची सुनावणी झाली, त्या न्यायमूर्तींना गुजरात सरकारने विचारले होते का? यासंदर्भात मी काहीही ऐकलेले नाही. अशा प्रकरणांमध्ये राज्य सरकारला केंद्र सरकारशी देखील सल्लामसलत करावी लागते. त्यांनी हे केले होते का? मला त्याबद्दल काहीही कल्पना नाही. जर त्यांनी केंद्राचा सल्ला घेतला असेल, तर मग यासंदर्भात केंद्र सरकारची काय भूमिका होती? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून निवृत्त झालेले यू.डी. साळवी यांनी बोलताना उपस्थित केला आहे.

## चर्चेतली बातमी

### झारखंडच्या मुख्यमंत्र्यांची आमदारकी धोक्यात?



आधुनिक केसरी न्यूज

**रांची :** भारतीय निवडणूक आयोगाने झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना आमदार म्हणून अपात्र ठरवण्याची शिफारस केली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. निवडणूक आयोगाने झारखंडचे राज्यपाल रमेश बैस यांना यासंदर्भात पत्र लिहिले आहे. राज्यपाल रमेश बैस अवैध खाण वाटप प्रकरणात निवडणूक आयोगाकडे मत मागितले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने ही शिफारस केली आहे. दरम्यान, झारखंडचे राज्यपाल सध्या दिल्लीत असून ते आज झारखंडमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ९ (अ) चा दाखला देत, हेमंत सोरेन यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केल्याचा ठपका ठेवला आहे. १८ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाने हेमंत सोरेन आणि त्यांचे भाऊ बसंत सोरेन या दोघांचेही म्हणणे ऐकून घेतले होते. त्यानंतरच निवडणूक आयोगाने अपात्रतेची शिफारस केली आहे. मात्र, अंतिम निर्णय राज्यपालांकडून घेतला जाणार आहे.

# कोरोनाने अर्थव्यवस्थेला मारले पण कृषी क्षेत्राने तारले : कॅगचा अहवाल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कोरोना महासाथीच्या काळात राज्याच्या अर्थव्यवस्थेला ब्रेक लागला असताना कृषी क्षेत्राने चांगली कामगिरी केली असल्याचे राज्याच्या लेखा परीक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. राज्याच्या महाविकास आघाडी सरकारने राजकोषीय तूटदेखील तीन टक्क्यांहून करण्यास यश मिळवले असल्याचे कॅगने आपल्या अहवालात म्हटले आहे. मात्र, राज्याचा आर्थिक विकास दर तीन टक्क्यांनी घसरला असल्याचे समोर आले आहे. कॅगने राज्याचे माजी अर्थमंत्री अजित पवार यांचे आर्थिक शिस्तीसाठी कौतुक केले आहे.

कॅगचा अहवाल आज विधानसभेत सादर करण्यात आला. कॅगच्या अहवालानुसार, राज्यावरील कर्ज 2016-17 या वर्षात चार लाख कोटी एवढे होते. या कर्जात वाढ झाली असून आता पाच लाख 48 हजार 176 कोटी इतके झाले आहे. कोरोना महासाथीचा आजार आणि त्याला अटकाव करण्यासाठी लावण्यात आलेला लॉकडाऊन यामुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झाला. कोरोना महासाथीचा प्रभाव कमी होत असल्याने टप्प्याटप्प्याने निर्बंध हटवण्यात आले होते. त्याचाही आर्थिक घडामोडीवर परिणाम झाला असल्याचे कॅगने म्हटले.

**कर महसूल घटला**

मागील वर्षीच्या तुलनेत राज्याचा कर महसूल 13.7 टक्क्यांनी घसरला असल्याचे कॅगने म्हटले आहे. वर्ष 2019-20 मधील महसूल दोन लाख 83 हजार 189.58 कोटी इतका होता. तर वर्ष 2020-21 मध्ये महसूल दोन लाख 69 हजार 468.91 कोटींवर घसरला. जीएसटीमध्ये 15.32 टक्क्यांनी घसरण झाली. तर, व्हॅटमध्ये 12.24 टक्क्यांनी घट झाली असल्याचे कॅगने म्हटले. राज्य सरकारचे कर्जावरील व्याज, वेतन आणि निवृत्ती वेतन यावर एकूण महसुली खर्चाचा 57.33 टक्के इतका भाग खर्च झाला आहे. महसुली खर्चात घट झाल्यामुळे 41 हजार 141.85 कोटींची महसुली तूट झाली आहे.

**कृषी क्षेत्रांनी तारले**

कोरोनामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला ब्रेक लागला असताना दुसरीकडे कृषी क्षेत्राने अर्थव्यवस्थेत सकारात्मक योगदान दिले. कृषी क्षेत्र या एकमेव क्षेत्रात सकारात्मक चित्र दिसून आले. राज्याच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राने 11 टक्क्यांचे योगदान दिले. तर, राज्यातील उद्योग क्षेत्रात 11.3 टक्क्यांची घसरण नोंदवण्यात आली. सेवा क्षेत्र 9 टक्क्यांनी घसरले असल्याचे कॅगने म्हटले.

# मोदी सरकारने तपासात सहकार्य केले नाही

## पेगासस हेरगिरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशातील काही राजकीय नेते, विरोधक, पत्रकार यांच्यासह अनेक बड्या लोकांच्या फोनमध्ये 'पेगासस' व्हायरस इन्स्टॉल केल्याचा आरोप सरकारवर करण्यात येत होता. याबाबतचा एक अहवाल आज सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सादर करण्यात आला आहे. पेगाससबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने आपल्या अहवालात धक्कादायक खुलासा केला आहे.

पेगागस व्हायरस असल्याच्या संशयातून २९ फोन तपासले असता त्यातील पाच फोनमध्ये मालवेअर सापडल्याचे अहवालात म्हटले आहे. परंतु पेगासस स्पायवेअरचा कोणताही निर्णायक पुरावा आढळला नाही. याप्रकरणी चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य केले नाही, असेही या समितीने न्यायालयात सांगितले आहे.

राजकारणी, कार्यकर्ते आणि पत्रकारांच्या फोनमधील माहिती चोरण्यासाठी पेगासस स्पायवेअरचा कथित वापर करण्याबाबत, छाननी करण्यासाठी तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने आज सर्वोच्च न्यायालय आपला अहवाल



सादर केला आहे. पेगासस प्रकरणी चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने सहकार्य केले नाही, असे या अहवालात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, हा अहवाल तीन भागांमध्ये सादर केला आहे. तांत्रिक समितीचे दोन अहवाल आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर.व्ही. रवींद्रन यांच्या नेतृत्वाखालील समितीचा एक अहवाल, असे एकूण तीन अहवाल न्यायालयात सादर करण्यात आले आहेत. न्यायमूर्ती रवींद्रन यांच्या अहवालाचा तिसरा भाग सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर सार्वजनिक केला जाईल, असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. काही याचिकाकर्त्यांनी या अहवालाच्या पहिल्या दोन भागांची प्रत मागितली आहे. या मागणीबाबत सखोल तपास न्यायालयाकडून केला जाईल, असेही सरन्यायाधीशांनी म्हटले.

# दिल्लीत भाजपाचे 'ऑपरेशन लोटस' अयशस्वी

## सरकार पडणार नाही, आमदारांच्या तातडीच्या बैठकीनंतर आप पक्षाचा दावा

आधुनिक केसरी न्यूज


दिल्ली : आम आदमी पक्षाचे नेते तथा दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानी सीबीआयने छापेमारी केल्यानंतर चांगलीच खळबळ उडाली. या कारवाईनंतर भाजपावर सातत्याने टीका करणाऱ्या आपने भाजपाकडून दिल्लीमधील सरकार पाडण्यासाठी प्रयत्न केला जातो, असा गंभीर आरोप केला आहे. तसेच हे सरकार पाडण्यासाठी आपच्या आमदारांना २० ते २५ कोटी रुपयांचे आमिष दाखवले जात आहे, असा दावादेखील आप पक्षाने केला आहे. दरम्यान या घडामोडी घडत असताना आप पक्षाने आज सर्व आमदारांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीनंतर दिल्लीतील सरकार स्थिर असून कोणताही आमदार फुटणार



नाही, असा विश्वास आप पक्षाने व्यक्त केला आहे. असे असले तरी या बैठकीला काही आमदार अनुपस्थित होते. या आमदारांशी फोन कॉलद्वारे चर्चा झाल्याचे आप पक्षातर्फे सांगण्यात आले आहे.

अरविंद केजरीवाल यांनी बोलावलेल्या तातडीच्या बैठकीला ६२ पैकी ५३ आमदार उपस्थित होते. तर अनुपस्थित आमदारांपैकी काही आमदारांशी संपर्क करण्यात आल्याचे आप पक्षाकडून सांगण्यात आले. यापैकी दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष सध्या विदेशात आहेत. मनिष सिसोदिया हिमाचल प्रदेशमध्ये आहेत, असे आप पक्षाकडून सांगण्यात आले. तर उर्वरित आमदारांशी अरविंद केजरीवाल यांनी फोनवरून चर्चा केली असून त्यांनी सरकार पाडण्यासाठी आम्हाला भाजपाच्या लोकांनी संपर्क साधला होता, असे सांगितल्याची माहिती आपच्या प्रवक्त्याने दिली.

आम आदमी पक्षाच्या (आप) दिल्लीतील चार आमदारांना भाजपमध्ये सामील व्हा अन्यथा केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) लादलेल्या खोट्या खटल्यांना तोंड देण्यास तयार राहा, असे लाचेचे प्रलोभन आणि धमकी भाजपतर्फे देण्यात आल्याचा आरोप 'आप'कडून करण्यात आला. आमदारांना भाजपमध्ये सामील होण्यासाठी प्रत्येकी २० कोटी देण्याचा प्रस्ताव देण्यात आला होता. जर त्यांनी इतर आमदारांना सोबत आणले तर २५ कोटीही देण्याचे प्रलोभन दाखवले होते. जर त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारून भाजपमध्ये जाणे नाकारले, तर मात्र उपमुख्यमंत्री सिसोदियांप्रमाणे त्यांना 'सीबीआय', 'ईडी'च्या कारवाईस सामोरे जावे लागेल, अशी धमकीही भाजपच्या या नेत्यांकडून देण्यात आली होती, असा आरोप आम आदमी पार्टीकडून करण्यात आला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## सारे जहाँ से अच्छा ...

नंतर फक्त जमीन दिसू लागली. मग पर्वतशिखरे आणि नकाशात दिसतात तशा रस्त्यांच्या खुणा. मग समुद्र, पाणी. हळूहळू हे सगळे नाहीसे होत गेले. यान ढगात प्रवेश करते झाले. सूर्यप्रकाशात न्हालेल्या ढगांचे रुपेरी पुंजके नजरेस पडू लागले. ढगांच्या रूपातून जणू समुद्राचा भास होत होता. पुढे पुढे हे हे दृश्य दिसेनासे झाले. आता यानाने अंतराळात प्रवेश केला होता. आता सगळीकडे फक्त अंधार दिसत होता. जणू रात्रीचे साम्राज्य पसरले होते. समोर काळ्या रंगाच्या विशाल पडद्यावर चमचमणारे, फिरणारे ग्रहगोल दृगोचर होऊ लागले. हा सुंदर नजारा पाहून मन हरखून गेले.

याच ग्रहगोलांच्या प्रदेशातून जात असताना यान किंचित काळ एका ठिकाणी स्थिर झाल्यासारखे भासले. समोर एक निळ्या रंगाचा ग्रह दिसू लागला. इतका सुंदर ग्रह मी कधी पाहिला नव्हता. मी त्यात



हरवून गेलो. तेवढ्यात मला सांगण्यात आले, ' ही आपली पृथ्वी. ' पृथ्वी माझ्या डोळ्यासमोर फिरत होती. इतके दिवस पृथ्वीवर राहून तिला अनुभवणारा मी आता अवकाशातून तिला निरखित होतो. ' केवळ अद्भुत..! ' माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले. माझी पृथ्वी निरनिराळ्या रंगात मला प्रतीत होत होती. निळा, पांढरा, राखाडी, काळपट, हिरवा असे विविध रंग जाणवत होते. काही ठिकाणी पृथ्वीवरचे दिवे प्रकाशमान झालेले भासत होते. या दृश्यात हरवून गेलो असतानाच मला माझ्या भारतमातेची आठवण आली. कशी दिसत असेल माझी भारतमाता ? मी त्या अंतराळवीरांना म्हटलं, ' मला जरा माझी भारतमाता दाखवता का ? ' यान थोडे अधिक पृथ्वीच्या जवळ आल्यासारखे वाटले. आणि ' आसेतु हिमालय ' असलेल्या भारतभूमीचे मला दर्शन झाले. अंतराळातून भारत कसा दिसतो ? १९८४ मध्ये अंतराळात गेलेल्या राकेश शर्मा यांना हा प्रश्न तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारला होता. त्यांनी मोठे सुंदर उत्तर दिले होते. ' सारे जहांसे अच्छा...' तोच अनुभव मी घेत होतो. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### उच्च मानसिक तणावाचा विपरीत परिणाम

आधुनिक केसरी

दररोजच्या चिंता तुमच्या विचारांमध्ये तुम्हाला अडकवतात, तर काही चिंता अनेकदा शरीरात शारीरिकरित्या प्रकट होतात. त्यामुळे तुम्हाला अशक्त किंवा हलके वाटू शकते. चिंताग्रस्त विकार वयानुसार वाईट होतातच असे नाही, परंतु चिंताग्रस्त लोकांची संख्या आयुष्यभर बदलते. वृद्धापकाळात चिंता अधिक सामान्य होते आणि मध्यमवयीन प्रौढांमध्ये सर्वात सामान्य असते. मेंदूतील रासायनिक प्रक्रियांमुळे चिंता प्रबळ तेव्हा होते, जेव्हा एखाद्या व्यक्तीला चिंता वाटते आणि त्याला लक्ष केंद्रित करण्यास किंवा स्पष्टपणे विचार करण्यास त्रास होत असतो. मानसिक आरोग्य निदान आणि शारीरिक आजारांसह अनेक परिस्थितींमुळे चिंता निर्माण होऊ शकतात. अधूनमधून चिंता अनुभवणे सामान्य आहे असे वाटत असले तरीही, विशेषतः उच्च तणावाच्या काळात त्याचा खूप मोठा आणि विपरीत परिणाम भोगावा लागत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सकारात्मक विचार आपल्या कल्याणासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी खरोखर महत्त्वपूर्ण असतात. मानवी अनुभवातील राग आणि दुःख यासारख्या भावनांची भूमिका स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे. जर तुम्हाला चिंता किंवा फोबियासारखा प्रकार असेल तर, एकांत, मनःशांती, ध्यानाभ्यास तुम्हाला शांत वाटण्यास तसेच इतर समस्यांना तोंड देण्यास, अधिक सक्षम होण्यास मदत करू शकतात. रात्रीच्या वेळी तुमची चिंता वाढण्याची अनेक कारणे असू शकतात. दैनंदिन ताणतणाव, झोपेच्या खराब सवयी आणि आरोग्याच्या इतर परिस्थितींमुळे रात्रीच्या वेळी चिंता आणि पॅनीक अटॅक वाढू शकतात. अर्थात, त्यावर अनेक उपचार उपलब्ध आहेत जे तुमची चिंता कमी करण्यात आणि तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात.



आधुनिक केसरी

### सात्त्विक छायेत | ध्यान करी ||

चिंतन मनन | अखंड करावे ||
विद्येस भजावे | रात्रंदिन ||१||

आळस करतो | घात आयुष्याचा ||
काळ तारूण्याचा | मौल्यवान ||२||

आळवाचा थेंब | यौवन जपावे ||
संयमी रहावे | दोषमुक्त ||३||

सज्जनांचा संग | दुर्जनांचा त्याग ||
उत्तम हा योग | सुखदायी ||४||

गुंतू नको मना | पाशवी मायेत ||
सात्त्विक छायेत | ध्यान करी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी


**प्राप्तं पदं प्रथमतःकिलयत्प्रभावान्
माङ्गल्यभाजिमधुमाथिनिमन्मथेन ।
मय्यापतेत्तदिहमन्थरमीक्षणार्धं
मन्दालसं चमकरालयकन्यकायाः ॥७॥**

समुद्रकन्या कमलेची ती मंद, अलस, मंथर आणि अर्धोन्मीलित दृष्टी, जिच्या प्रभावाने कामदेवाने भगवान मधुसूदनाच्या हृदयात पहिल्यांदा स्थान प्राप्त केले होते, ती दृष्टी इथे माझ्यावर पडो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### सगुणभजन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जे घडणार आहे ते जर काही केल्या टळत नाही तर सगुणाच्या भजन पूजनाला काही अर्थ आहे का? असा विचार केला तर सगुणोपासना बुध्दीला अजिबात पटत नाही. येथे श्री समर्थांनी आपल्या सारख्या सामान्य माणसाचा विचार बरोबर व्यक्त केला आहे. समर्थ म्हणतात की त्याला देव हवा असतो पण तो प्रपंचातील अडचणी  निवारण करण्यासाठी हवा असतो. आत्मज्ञान होण्यासाठी नको असतो. खरं तर आपली संस्कृतीत मोठ्यांना प्रेमाने वागवण्याची आहे.त्यामुळे मला गुरूंची आज्ञा सदैव मान्य आहे. कोणीही शिष्य ती अप्रमाण मानून मोडणार नाही. तिचा पुरावा कोणीही मागणर नाही. तरी पण सगुण भजनाचे फळ काय ते  मला सांगितले तर माझ्या शंकांचे निरसन होईल. या संपूर्ण आक्षेपाचे समर्थ ऊतर देतात की,आत्मज्ञानाच्या लक्षणांचा विचार पूर्वक विचार कर. आणि देहाने म्हणजे सगुणाने तुला काही कर्म करावे लागते का ते मला सांग. आत्मज्ञान झाले की कर्म नाश पावते.निर्गुण आत्मस्वरूप तेवढे खरे असा साक्षात प्रत्यय येतो. **(क्रमशः)**

## हे श्रीकृष्णा...

आधुनिक केसरी

भूषण भन्साली

आणि एके रात्री त्याने पळून जाण्याचा बेत ठरवला. सर्व जण झोपी गेल्यावर गुपचुप घरातून निघून तो नदीकिनारी जीव द्यायला आला व त्याने नदीत उडी मारली तर खरी पण नाकातोंडात पाणी गेल्यावर त्याच्या मनात त्याने सवयीप्रमाणे श्रीकृष्णाचा धावा करायला सुरवात केली.. श्रीकृष्णा वाचव रे.. "

इतक्यात श्रीकृष्णाने त्याला हाताला धरून पाण्याबाहेर काढलं. तेव्हा त्याला आठवण झाली की मी तर श्रीकृष्णासाठी पाणी आणायला गेलो होतो. श्रीकृष्ण हसत होता. "बघ नारदा तु साठ वर्षे संसार जगलास, तुला कितीतरी मुलंही झाली. झाली ना संसाराची इच्छा पूर्ण की जायचंय पुन्हा त्या संसारात?"

" नको नको कृष्णा. कंटाळलो रे त्या जीवनाला. पण तू ही साठ वर्षं फक्त दोनच क्षणात कशी काय घडवलीस रे?"

" नारदा, मला अशक्य काही नाही. आज तुला रहस्य सांगतो. काळ नावाची कुठली स्वतंत्र गोष्ट अशी अस्तित्वातच नाही. इच्छेमुळे काळ भासतो. इच्छा केली की जीव आकर्षणात अडकतो. आकर्षणाचं स्वतःचं असं गुरूत्व असतं. त्या गुरूत्वाकर्षणामुळे काळ भासतो. इच्छा केल्यापासून ती पूर्ण होईपर्यंत जो भास असतो तो काळ होय. इच्छेला खरं मानलंस तर काळ खरा भासतो. मी जो परमेश्वर तो या काळाच्याही पलीकडे असतो आणि हे सामर्थ मला केवळ निरिच्छ राहील्यामुळे प्राप्त झालं आहे. मला भगवान म्हणतात त्या भग म्हणजे सहा श्रेष्ठ गुणांपैकी निरिच्छता हा गुण मुकुटमणी आहे. मी तर हे विश्व चालावं अशी इच्छाही करत नाही. आणि म्हणूनच ते आपोआप चालतं, प्रत्येक जीवाच्या कर्मानुसार व एकूण एकत्रित कर्मांनुसार. फक्त माझी भक्ती करणारे जीव मला त्यांच्या गुरुत्वाकर्षणात बांधून ठेवु शकतात. केवळ मला आतुन हाक मारली की मी तीथे लगेच प्रकट होत असतो. खरं तर मी सर्वत्र निर्गूण रूपात प्रत्येकाचा आत्माच असतो. पण आतुन जाणिव रूपाने माझ्यापासून वेगळा नसतो अशा



विभक्त नसलेल्या भक्तासच केवळ मी आनंदासाठी वेगळेपणाने दर्शन व अनुभव देत असतो."

" श्रीकृष्णा तुझी लीला अपरंपार आहे. खरं तर तुझं हे मधुर बोलणं तासनतास ऐकतच रहावं असं वाटतंय. खरंच मला एक क्षणही तुझा विसर पडू देवु नकोस रे. हेच काय ते वरदान दे रे मला. "

" अरे नारदा, मी तर तुझ्यावर कधिच प्रसन्न आहे. माझी भक्ति करणारा कधिच अधोगतिला जात नाही. मी स्वतः त्याला अंतर्बाह्य सांभाळतो. चल मला आता गेलं पाहीजे."

" अरे मला सोडून श्रीकृष्णा तु कुठे चाललास? पुन्हा केव्हा भेटशील रे."

" नको काळजी करूस नारदा. मी सतत सोबत आहेच तुझ्या. आणि वेळोवेळी भेटतही जाईन."

" बरं पण मला सांग आता तू कुठे चाललास?"

" नारदा, तुला माझं आणखी एक गुपित सांगतो. मला जेव्हा काहीच नको असतं तेव्हा मी गोलोकास जातो. माझ्या स्वयंभू महामायेने मी तो लोक फार दूर असा ठेवलाय अनंत कोटी ब्रह्मांडांच्याही पलीकडे. तिथे कुणीही माझ्या परवानगीशिवाय प्रवेश मिळवु शकत नाही. युगायुगाचे माझे भक्त जे मुक्त झालेले असतात व त्यांना ती मुक्तिही नको असते व फक्त केवळ मीच हवा असतो अशा सर्व भक्तांना मी स्त्रीरूप देऊन त्या गोलोकात ठेवतो. तिथे काळ नसतो. तिथे अखंड रासलीला नृत्य सुरू असते. त्या प्रत्येकीबरोबर मी वेगळेपणाने रासलीला खेळत असतो गोलाकार गर्भवर्तुळांत. जितक्या गोपी तितके श्रीकृष्ण असतात तिथे. आणि त्यांची अखंड आनंद रासलीला सुरूच असते. रासलिला म्हणजे फक्त अपरंपार प्रेम आणि त्या प्रेमात खेळणे. मी एकाच वेळी अनंतकोटी ब्रह्मांड व्यापून असलो, तिकडे वैकुंठात लक्ष्मीला दिसत असलो तरीही माझा आत्मा खरं तर माझ्या अनन्य भक्तांच्या हृदयात असतो. मी त्यांच्या मागेपुढे वावरत असतो अतिव प्रेमाने त्यांना सांभाळत."

"नाराSSयण नाराSSयण"

विणेच्या झंकारात नामस्मरण करीत नारद मुनी निघाले पुन्हा स्वानंदात.. खरं तर हे सर्व जग म्हणजे नारायणच आहे या अनुभवातुनच ते नाम येत होतं..

नाराSSयण नाराSSयण...

# खंडित केलेला वीजपुरवठा परस्पर जोडल्यास दाखल होणार गुन्हा

## ५१३ जणांचा वीजपुरवठा खंडित, ११४ जणांचे काढले मीटर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या थकबाकी वसुली मोहिमेत गुरुवारी (२५ ऑगस्ट) औरंगाबाद शहरातील विविध भागात ५१३ थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तर वीजपुरवठा खंडित असलेल्या ११४ ग्राहकांचे मीटर व सर्व्हिस वायर काढून घेण्यात आले. थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केल्यानंतर ग्राहकाने परस्पर किंवा शेजाऱ्यांकडून वीजपुरवठा घेतल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा महावितरणने दिला आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार मुख्य अभियंता भुजंग खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू आहे. त्यानुसार शहागंज उपविभागातील हर्सूल, नवाबपुरा शाखेअंतर्गत सईदा कॉलनी, मुझफ्फरनगर, रमाईनगर, जहांगीर कॉलनी, चेतनानगर, मिसारवाडी, हर्सूल, युनूस कॉलनी, कटकटगेट, किराडपुरा येथे कारवाई करण्यात आली. ३८ ग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला, तर ११४ ग्राहकांचा



वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला. ९ ग्राहकांकडून वीजबिल भरून घेण्यात आले. तीन वीजचोरांवर कारवाई करण्यात आली. या विशेष मोहिमेत अधीक्षक अभियंता उत्क्रांत धायगुडे, संजय सरग, प्रकाश जमधडे, कार्यकारी अभियंता प्रेमसिंग राजपूत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनय घनबहादूर, संजीव कोंडगुळी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले.

याशिवाय क्रांती चौक उपविभागात १९७, चिकलठाणा १८७, गारखेडा ७४ व सिडको, उपविभागात १७ ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीपोटी खंडित करण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता महेश पाटील यांनी सांगितले. दरम्यान, या मोहिमेत थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केल्यानंतर संबंधित वीजजोडण्यांची स्वतंत्र पथकांद्वारे पडताळणी सुरू आहे. तसेच या वीजजोडण्यांची सायंकाळनंतरदेखील विशेष तपासणी करण्यात येत आहे. या दोहोंमध्ये शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून वायर किंवा केबलद्वारे विजेचा वापर आढळल्यास शेजारी व वीज वापरणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. सोबतच थकीत बिलाची रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे.

घरबसल्या वीजबिल भरण्यासाठी लघुदाब वर्गवारीतील सर्व वीजग्राहकांना www.mahadiscom.in वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे 'ऑनलाईन' सोय उपलब्ध आहे. लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती ग्राहकांचे वीजबिल १० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यास त्यांना 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी'द्वारे थेट वीजबिल भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# श्री पिनाकेश्वर शेतकरी परिवर्तन विकास पॅनलचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील गव्हाली व गव्हाली तांडा गावातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या सोसायटीच्या निवडणुकीत शामराव निकम, माधव निकम, बाबासाहेब काळे यांच्या श्री पिनाकेश्वर शेतकरी परिवर्तन विकास पँनलने १२ जागेवर मोठ्या फरकाने विजय मिळवत, विद्यमान चेअरमन सुनील गुलाबराव चव्हाण यांच्या पँनलचा धुव्वा उडवला. निवडणूक अधिकारी सुनील यांनी सायंकाळी ५वाजता निकाल जाहीर करताच विजयी उमेदवारांनी एकच जल्लोष करत ढोल, ताश्याच्या गजरात गव्हाली व गव्हाली तांडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भव्य अशी मिरवणूक काढुन एकच जल्लोष करण्यात आले.

विजयी उमेदवार पुढील प्रमाणे देवराव रामराव निकम, नामदेव नवनाथ निकम, नानासाहेब बाबुराव निकम, बद्रीनाथ शामराव निकम, बापू अण्णा निकम, सुभाष देवराव निकम, नेमा रूपा राठोड, बळीराम शामराव निकम, छाया शिवाजी चव्हाण, सविता



दिनेश निकम, तुकाराम रायभान काळे, शामराव शंकर बोर्डे या सर्व विजयी उमेदवारांची गव्हाली व गव्हाली तांडा गावात भव्य अशी विजयी मिरवणूक काढुन एकच जल्लोष करण्यात आला. मिरवणुकीत किशोर निकम, माधव निकम, बाबासाहेब काळे, विठ्ठल निकम, समाधान निकम, किशोर निकम, सुखदेव कदम, गव्हाली व गव्हाली तांडासह परिसरातील ग्रामस्थ शेकडोंच्या संख्येने विजयी मिरवणुकीत सहभागी झाले होते.

श्री पिनाकेश्वर शेतकरी परिवर्तन विकास पॅनल विजय करण्यासाठी गव्हाली व गव्हाली तांडा येथील सर्व शेतकरी मतदार बंधू व भगिनी तसेच सर्व पॅनल प्रमुख दोन्ही गावातील व सर्व शिलेदार आणि मतदार यांना कष्ट करून या पॅनलला दणदणीत विजय मिळवून दिला. विजय झाल्यानंतर पॅनल प्रमुख तसेच सर्व विजय उमेदवारांनी दोन्ही गावातील मतदारांना आभार व्यक्त केले.


# घरात सिलेंडरचा भीषण स्फोट; तिघे गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेकडील गायकवाड परिसरातील पारसनाथ इमारतीच्या तळमजल्यावरील एका घरात स्फोट होऊन घरातील मनीषा मोर्वेकर यांच्यासह घराजवळून जाणारे उरसुला लोढाया आणि रियांश असे तिघे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गॅस गळती होऊन हा स्फोट झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तसेच विष्णुनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ही घटना संध्याकाळी साडेसातला घडली. डोंबिवली पश्चिमेला गायकवाडवाडी परिसरात हा गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट घडला आहे. पारसनाथ इमारतीतील तळमजल्यावरील घरात हा स्फोट झाला. या स्फोटात महिलेसह तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

# महागाईमुळे पोळा सणावर निरुत्साहाचे सावट

## शेतकरी संकटात : आधुनिक केसरीस शेतकऱ्यांच्या भावनाविवश प्रतिक्रिया



आधुनिक केसरी

कृषिप्रधान संस्कृतीत महत्त्वपूर्ण समजला जाणारा पोळा सण दोन दिवसावर येऊन ठेपला आहे. मागील दोन वर्षांपासून अस्मानी संकटामुळे शेतकरी बेजार आहे. कोरोनामुळे सणावर निर्बंध होते. आता सणास सुरवात होत असतानाच सध्याच्या प्रचंड महागाईमुळे बळीराजा आर्थिक संकटात अडकला आहे. अशातच दोन दिवसावर येऊन ठेपलेल्या पोळा सणावर महागाईची झूल पसरलेली दिसत आहे. बैलाची झूल, शिंगे रंगवण्याचे रंग , कंबरपट्टा, फुले, फूगे कवडीमाळ, बाशिंग इत्यादी साहित्य 30 ते 40 टक्क्यांनी महागले असल्याने हा सणावर निरुत्साहाचे सावट पाहयला मिळत असल्याच्या भावनाविवश प्रतिक्रिया आधुनिक केसरीस शेतकऱ्यांनी दिल्या.




### शेतकरी उध्वस्त झालाय, सण साजरा कसा करायचा?



शेतकरी सध्या प्रचंड अडचणीत आहे. शेती, मुलांचे लग्न आणि इतर प्रापंचिक खर्च भागविण्यासाठी शेती विकल्याशिवाय पर्याय राहिला नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून जमिनी न राहिल्यामुळे अल्पभूधारक होण्याचे प्रमाण वाढत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे पिंकाची वाढ होत नाही. आणि उत्पन्नही मिळत नाही. या टोकदार अनूभवांनी आम्ही उध्वस्त झालो आहोत. दोन दिवसावर आलेला पोळा सण साजरा करण्याची हिंमत उरलीच नाही आहे. पदरात काहीच नाही तर आनंद साजरा करायचा? या प्रश्नाने झोप उडाली आहे.

**– श्यामसुंदर चिखलबिडे,**
शेतकरी, लोकरवाडी ता.सोनपेठ जि परभणी

### सण साजरे करण्याची इच्छा मेली...



निसर्गाचे विचित्र स्वरूप आणि महागाई यामुळे शेती करावी काय? हा प्रश्न आम्हांला सतत डोळ्यात खोलवर बोटे घालत आहे. हातातोंडाशी आलेले मिळत नाही. म्हणून जगायचे कसा प्रश्न आमच्यावर अखंड परिणाम करीत आहे. आमचे दु'ख कोणीच जाणत नसल्याने आमच्यासमोर मरण आ वासून उभा आहे. तर हातात काहीच नसल्याने सण साजरे करण्याची इच्छाच मेली आहे.

**- बालासाहेब वैरागे**
**शेतकरी, साळेगाव ता.केज जि बीड**

### जुन्याच वस्तू वापरून सण साजरा करणार. !



अस्मानी संकटाने पायाखालची वाळू घसरली आहे. पेरणी करूनही हातात काय पडेल याची शाश्वती उरली नाही. निसर्गाने आमच्यावर कोपलयाने रात्र रात्र झोप येत नाही. उद्याचे काय म्हणून उरात धडकी भरली आहे. महागाईमुळे उद्याच्या सणासाठी काही आणण्यासाठी बाजारात जायची इच्छा उरली नाही. दोन वर्षापूर्वीचे बैलांचे साहित्य आहे. तेच वापरून सण साजरा करावा लागतो याचे दुःख वाटते.

**- अदिनाथ शेप**
**शेतकरी, शेपवाडी ता. अंबाजोगाई, जि.बीड**

### मेक इन इंडियावाले मिठावरही कर लादणार का? सणाचा आनंद उरलाच नाही...



शेतकऱ्यांचे दुःख पाचवीला पुंजलेले आहे. त्यात कोरोना आणि त्यानंतरच्या महागाईने भर घातली आहे. निसर्ग आणि महागाई आमची पाठ सोडायला तयार नाही. आनंद काय असतो हे आम्हाला विसरावे लागत आहे. वर्षांतून एकदा येणारा आणि सर्जा राज्याला सजविण्यासाठी हातात पैसा नसल्याने डोळ्यात अश्रू उभे राहतात. म्हणून नाइलाजास्तव हात आखडता घ्यावा लागतो आहे.

**- ईश्वर मस्के , शेतकरी, बाभळगाव ता.जि.लातूर**

### शेतकऱ्यांच्या वेदना व्यवस्थेने जाणत्या पाहिजेत...



शेती आणि शेतकरी यांचे शोषण काही थांबायला तयार नाही. त्यांच्या प्रश्नांची दखल न घेता त्याला सोईनुसार बदलविले जाते हे व्यवस्थेचे खूप मोठे अपयश आहे. शेतकऱ्यांच्या खिशात छदाम नाही, तो महागाईने मेटाकुटीस आला आहे. तर सण साजरा कसा करणार हा प्रश्न आहे. याची व्यवस्थेने दखल घेतली पाहिजे.

**-दत्ताबापू काळुंके**
**सामाजिक कार्यकर्ते, अंबाजोगाई.**

### भविष्यात चित्रातील बैलाची पूजा करावी लागणार का?



सध्या शेती आणि शेतकरी अडचणीत आले आहेत. शेती, जनावरे आणि साधने सांभाळणे आवाक्याबाहेर गेले आहे. म्हणून हे चित्र शेतीप्रधान भारताला निश्चितच भुकेकंगाल करणारे आहे. पोळा सण, त्यातील विविधता काळाच्या ओघात मागे पडली तर भविष्यात चित्रातील बैलाची पूजा करावी लागेल. महागाईतील जीएसटीमुळे पोळयाची घंटा वाजणार का? असा प्रश्न अस्वस्थ करतो आहे.

**- सुधाकर देशमुख**
**शेतकरी, ममदापूर ता.अंबाजोगाई जि.बीड**

# काँग्रेस पक्षाध्यक्ष; अशोक गेहलोत आघाडीवर

आधुनिक केसरी

काँग्रेसचे अध्यक्षपद गांधीतर नेत्याच्या हाती देण्याबाबत पक्षांतर्गत सहमती होऊ लागली असून राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे. काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी मंगळवारी गेहलोत यांच्याशी चर्चा केल्यानंतर नव्या पक्षाध्यक्षाच्या निवडीची प्रक्रिया गतिमान झाली आहे.काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत निवडणुका पार पडल्या असून आता पक्षाध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. २१ सप्टेंबपर्यंत नवा पक्षाध्यक्ष निवडला जाणार आहे. या निवडणुकीसाठी २० ऑगस्टपासून प्रक्रिया सुरू झाली असली तरी, माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी अजूनही पक्षाध्यक्षपद स्वीकारण्याची तयारी दाखवलेली नाही. काँग्रेसचा नवा अध्यक्ष गांधीतर असला पाहिजे, या भूमिकेवर राहुल गांधी ठाम असल्याचे काँग्रेसमधील सूत्रांचे म्हणणे आहे. राहुल गांधी यांना आम्ही समजावण्याचा खूप प्रयत्न केला. तुम्ही पक्षाध्यक्षपद स्वीकारले तर सोनियांना विश्रांती घेता येईल, असेही आम्ही राहुल यांना सांगितले होते. पण त्यांनी होकार दिलेला नाही, असे काँग्रेसमधील नेत्यांनी सांगितले. असल्याचे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे. मात्र त्यांची सातत्याने मनधरणी केली जात आहे. पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीसंदर्भात २८ ऑगस्ट रोजी कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली असून यामध्ये निवडणुका संपूर्ण कार्यक्रम निश्चित केला जाईल. ही बैठक दूरचित्रसंवादाद्वारे होणार असून तोपर्यंत राहुल गांधी होकार कळवला नाही तर, पक्षाला अधिकृतपणे गांधीतर नेत्याला पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरावे लागेल. राहुल गांधी पक्षाध्यक्ष होण्यास तयार होणार नाहीत, हे गृहीत धरून सोनियांनी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांची भेट घेऊन चर्चा केल्याचे सांगितले जाते. सोनिया, प्रियंका व राहुल गांधी हे तिघे परदेशी गेले असून रविवारी होणाऱ्या बैठकीत ते उपस्थित राहण्याची शक्यता कमी असल्याचे समजते.काँग्रेसच्या अध्यक्षपदी गांधी कुटुंबातील सदस्याची नियुक्ती न करण्याच्या भूमिकेवर राहुल गांधी ठाम असल्याने प्रियंका गांधी-वाड्रा यांचे नावही मागे पडले आहे. शिवाय भाजपकडून काँग्रेसवर सातत्याने घराणेशाहीचा आरोप खोडून काढण्यासाठीही गांधीतर नेत्याची नियुक्ती करावी, असे राहुल गांधी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता अशोक गेहलोत यांचे नाव अध्यक्षपदासाठी आघाडीवर आहे. त्यांच्याशिवाय मल्लिकार्जुन खरगे, कुमार शैलजा, मुकुल वासनिक यांची नावे काँग्रेसने चर्चेत ठेवली असली तरी सोनिया आणि गेहलोत यांच्या भेटीनंतर रविवारी होणाऱ्या बैठकीत गेहलोत यांना पक्षाध्यक्षपदाची उमेदवारी देण्यावर अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो.

अन्वयार्थ



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

# भाजपा सत्तेत येताना घडलेल्या घटना

आधुनिक केसरी

**पक्षांतर्गत लोकशाही, पक्षाची गरज आणि परिस्थिती पाहून दरवेळी योग्य बदल केले जातात. त्यामागे निवडणुकीचे गणित कारणीभूत असते. यात कोणाला वगळले आणि कोणाला घेतले हे त्या गणितावर आधारित असते. यात कोणाचे पंख छाटणे, दुर्लक्षित करणे, बाजूना फेकणे असे काहीही नसते. पक्षाची गरज, धोरणात्मक निर्णय घेणे आणि पुढील तीन ते पाच वर्षांचे पक्षाचे उद्दीष्ट, यश, वगैरे बाबींचा विचार करून हे बदल केलेले असतात. पत्रकार किंवा मिडिया अकारण यात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असते. कुणाला भडकवणे, गैरसमज पसरवणे, मुलाखती घेऊन अडचणीचे अवघड प्रश्न विचारून फुकट वादंग उभे करतात.**



मनमोहन सिंग पंतप्रधान असताना मौनी बाबा बणून राज्यकारभार नामधारी म्हणूनच पाहात होते. सर्व सूत्रे सोनिया गांधी यांच्याच हातात होती. भष्टाचाराचा अतिरेक झाला होता. दहशतवादी खूपच मोठ्याप्रमाणात आक्रमक कारवाया करत होते. त्यामुळे भारतीय जनता पक्षाने योग्य पर्याय दिला तर भाजपाला सत्तेत येण्याची शक्यता खूप जास्त निर्माण झाली होती.

अशावेळी भारतीय जनता पक्षाने नितीन गडकरी यांनाच पून्हा पक्षाध्यक्ष करण्यासाठी दोन टर्म पक्षाध्यक्ष पदासाठी उभे राहता येईल असा बदल स्वीकारण्याचे जवळजवळ ठरवले होते. पण जनमत पूर्णपणे काँग्रेस विरोधात गेल्याचे वेगवेगळ्या सर्वेक्षणातून समोर येत होते. त्या निवडणूका नितीन गडकरींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या असत्या तर कदाचित गडकरी पंतप्रधान पदाचे दावेदार ठरले असते. संघाची सुध्दा तशीच मानसिकता होती. परंतू एका सर्व्हे मधील निष्कर्षानुसार मानसिकता बदलली आणि नितीन गडकरी पुन्हा पक्षाध्यक्ष न होता राजनाथसिंह पक्षाध्यक्ष झाले. त्यांनी अडवाणी, जोशी, सुषमा स्वराज यांचा विरोध डावलून संघ संमतीने नरेंद्र मोदी यांना गुजराथ मधून केंद्रात आणण्याचा निर्णय घेतला. गोव्यातील पक्ष अधिवेशनात, त्यावेळी अडवाणी, सुषमाजी गैरहजर राहीले. परंतू संघ आदेशानुसार मुख्य प्रचारक म्हणून नरेंद्र मोदींचे नाव राजनाथसिंह यांनी जाहीर केले.

देशातील वातावरण फारच काँग्रेस विरोधात गेले होते आणि भाजपसाठी ते अनुकूल होते. मग जनमत आणि पक्षातील उत्साह पाहता, मोदींच्या गुजराथ मधील कामगीरीचा वापर करायचे ठरवले गेले. त्यावेळी नरेंद्र मोदींनी एक अट घातली की संजय जोशी जे सरचिटणीस होते आणि नितीन गडकरी यांचे अत्यंत जवळचे आणि विश्वासातील मित्र होते. त्यांना पदावरून दूर करावे आणि त्यांनी अजिबात लुडबूड करू नये.

नरेंद्र मोदी यांना भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून जाहीर करून भाजपाने अर्धी लढाई जिंकली असे वातावरण निर्माण झाले होते. भाजपच्या सर्व थरातील नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले होते. परंतु लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराज, मुरली मनोहर जोशी या जेष्ठांनी विरोध केला होता. त्यामुळे भाजपात सगळे अलबेल नाही असा समज होईल असे दिसताच संघ सूत्र हालले आणि अडवाणी जोशी मार्गदर्शक मंडळात गेले आणि सुषमा स्वराज मंत्रिमंडळात आल्या. पण तेंव्हा, म्हणजे मोदींचे नाव जाहीर करताना मोदींनी दुसरी अट घातली होती की उमेदवार निवड समितीचे अध्यक्ष ते स्वतःच असतील आणि त्यांचा निर्णय अंतीम राहील.

या दोन्ही अटींमुळे भाजपात बरीच खळबळ माजली होती. पण संघ धुरीणांनी सर्वांना योग्य समज देऊन शांत केले आणि भाजपची सत्ता आणण्यासाठी नरेंद्र मोदी यांना फ्री हॅंड दिला. हे राजकारण मोदी आणि राजनाथसिंह यांनी मुद्दाम घडवून आणले अशी तेंव्हा चर्चा होती. नंतर भाजपला चक्क बहूमत मिळाले आणि पक्षांतर्गत विरोध मोडीत निघाला. सर्वजण मोदींचे पाठी एकवटले.

तसेच आत्ता घडले आहे. भाजपाच्या राष्ट्रीय सांसदीय समिती मध्ये आणि केंद्रीय निवडणूक समिती मध्ये फेरबदल करताना असेच चांगले निर्णय घेण्यात आले आहेत.

संसदीय समितीची पुनर्रचना करताना 2024 पर्यंतच्या अकरा राज्यातील विधानसभा निवडणुका आणि लोकसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन सदस्यांमध्ये बदल केले आहेत. महाराष्ट्राचे भाषेत भाकरी फिरवली आहे.

पक्षांतर्गत लोकशाही, पक्षाची गरज आणि परिस्थिती पाहून दरवेळी योग्य बदल केले जातात. त्यामागे निवडणुकीचे गणित कारणीभूत असते. यात कोणाला वगळले आणि कोणाला घेतले हे त्या गणितावर आधारित असते. यात कोणाचे पंख छाटणे, दुर्लक्षित करणे, बाजूना फेकणे असे काहीही नसते. पक्षाची गरज, धोरणात्मक निर्णय घेणे आणि पुढील तीन ते पाच वर्षांचे पक्षाचे उद्दीष्ट, यश, वगैरे बाबींचा विचार करून हे बदल केलेले असतात. पत्रकार किंवा मिडिया अकारण यात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असते. कुणाला भडकवणे, गैरसमज पसरवणे, मुलाखती घेऊन अडचणीचे अवघड प्रश्न विचारून फुकट वादंग उभे करतात.

निवडणूक समिती मध्ये सदस्य घेताना नेत्याची मागील किमान पाच वर्षांची कामगिरी, विविध राज्यातील वेगवेगळ्या वेळी सोपवलेल्या विविध जबाबदाऱ्या पार पाडतानाची संबंधित नेत्याची यशाची टक्केवारी, त्याने घेतलेले योग्य कठोर निर्णय, त्यामुळे त्या राज्यात झालेले परिणाम, अशा कामगिरी चे मुल्यमापन केले जाते. आणि योग्य व्यक्तींची निवड या केंद्रीय समितीत केली जाते.

आता 2022-23 मध्ये अकरा राज्यात निवडणूका आहेत आणि 2024 मध्ये महत्वपूर्ण लोकसभा निवडणूक होऊ घातलेल्या आहेत. या सर्व राज्यांचे राजकीय परिस्थितीचा अंदाज घेऊन, अभ्यास करून योग्य व्यक्तींची वर्णी लावली जाते. यात दुजाभाव नसतो.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# मधुमेह : शरीरातच पुन्हा तयार होईल इन्सुलिन

आधुनिक केसरी

**शरीरात पुन्हा इन्सुलिन तयार करण्याचे संशोधन सुरू असताना भारतातील गुवाहाटीतील आयआयटीतील संशोधकांनी साखरेला पर्याय शोधून काढला आह. ऊस गाळपानंतर शिल्लक राहिलेल्या उसाच्या 'बगॅस'पासून साखरेला 'झायलीटॉल' हा सुरक्षित पर्याय शोधला आहे. हा पदार्थ तयार करण्यासाठी संशोधकांनी अल्ट्रासाउंडच्या मदतीने किण्वन पद्धत विकसित केली आहे. हे संशोधन 'बायोरिसोर्स टेक्नॉलॉजी' आणि 'अल्ट्रासोनिक्स सोनाकेमिस्ट्री' या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे. यामुळे केवळ मधुमेहाच्या रुग्णांवरच नव्हे तर एकूणच आरोग्यावर होणाऱ्या साखरेच्या दुष्परिणामांबद्दल जागरूक असलेल्या लोकांनासुद्धा याचा फायदा होईल.**

ऑस्ट्रेलियातील शास्त्रज्ञांनी एक मार्ग शोधला आहे, ज्याद्वारे शरीरातच पुन्हा इन्सुलिन बनवता येईल. संशोधन अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात असले तरी, मधुमेहावर निश्चित उपचार करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली गेली आहेत. असा अभ्यास ऑस्ट्रेलियाच्या मोनाश विद्यापीठात करण्यात आला आहे. याद्वारे, स्वादुपिंडाच्या स्टेम पेशींमध्ये इन्सुलिन आपोआप तयार होण्यास सुरुवात होते त्या प्रक्रियेबद्दल माहिती गोळा करण्यात आली आहे. टाईप 1 आणि टाईप 2 मधुमेहावरील उपचारांसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असेल.संशोधकांनी टाइप 1 मधुमेह असलेल्या रुग्णाने दान केलेल्या स्वादुपिंडाच्या पेशींचा अभ्यास केला. त्यांनी यूएस फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनने मंजूर केलेले औषध वापरले, जे सध्या मधुमेहाच्या उपचारात वापरले जात नाही. या औषधाच्या माध्यमातून स्वादुपिंडाच्या स्टेम पेशी पुन्हा सक्रिय करण्यात आणि 'इन्सुलिन एक्स्प्रेसिंग' तयार करण्यात संशोधकांना यश आले.

या दिशेने अजून संशोधनाची गरज असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. यशस्वी झाल्यास त्याचा उपचार मधुमेह बरा करण्यासाठी केला जाऊ शकतो. अशा प्रकारे, टाइप 1 मधुमेहामुळे गमावलेल्या पेशी नवीन पेशींनी बदलल्या जातील, जे इन्सुलिन तयार करण्यास सक्षम असतील. हे संशोधन ऑस्ट्रेलियातील मोनाश विद्यापीठातील डायबेटोलॉजिस्ट प्रोफेसर सॅम अल-ओस्ता आणि डॉ इशांत खुराना यांनी केले आहे. पूर्ण यश मिळाल्याने मधुमेही रुग्णांची औषधे किंवा इंजेक्शनची गरज दूर होऊ शकते.जगभरात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या 50 कोटी ओलांडली आहे आणि हा आजार सर्वात धोकादायक आजारांपैकी एक आहे. या आजारावर योग्य उपचारही उपलब्ध नसल्याने जगभरातील संशोधकांसमोर मोठे आव्हान आहे. प्रोफेसर अल-ओस्ता यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, "आम्ही ओळखतो की आमचे संशोधन अतिशय खास आहे आणि नवीन उपचार शोधण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे."

नेचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनानुसार, स्वादुपिंडाच्या मृत पेशींच्या जागी नवीन पेशी सक्रिय करण्यासाठी संशोधकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. सामान्यतः असे मानले जाते की एकदा नुकसान झाले की स्वादुपिंड बरा होऊ शकत नाही. प्रोफेसर अल-ओस्ता यांच्या म्हणण्यानुसार, एखाद्या व्यक्तीला टाइप 1 मधुमेह (T1D) चे निदान होईपर्यंत, त्याच्या अनेक स्वादुपिंडाच्या बीटा पेशी नष्ट झालेल्या असतात ज्या इन्सुलिन बनवतात.या प्रकरणात, मधुमेह स्वादुपिंड इन्सुलिन तयार करण्यास अक्षम होतो. स्वादुपिंड बीट प्रत्यारोपण हा एकमेव प्रभावी पर्याय आहे. यामुळे मधुमेही रुग्णांच्या आरोग्यासाठी चांगले परिणाम दिसून आले आहेत, परंतु प्रत्यारोपण हे एखाद्याच्या देणगीवर अवलंबून असते, त्यामुळे त्याचा फारसा उपयोग होत नाही.

संशोधनात सहभागी असलेले तज्ज्ञ डॉ. अल-हसानी यांच्या मते, जगातील लोकसंख्या वाढत आहे आणि टाइप 2 मधुमेहाची आव्हाने वाढत आहेत, ज्याचा लठ्ठपणा वाढण्याशीही संबंध आहे. रुग्णांपर्यंत पोहोचण्यापूर्वी अनेक समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. या पेशी परिभाषित करण्यासाठी अधिक काम करणे आवश्यक आहे.

तिकडे शरीरात पुन्हा इन्सुलिन तयार करण्याचे संशोधन सुरू असताना भारतातील गुवाहाटीतील आयआयटीतील संशोधकांनी साखरेला पर्याय शोधून काढला आह. ऊस गाळपानंतर शिल्लक राहिलेल्या उसाच्या 'बगॅस'पासून साखरेला 'झायलीटॉल' हा सुरक्षित पर्याय शोधला आहे. हा पदार्थ तयार करण्यासाठी संशोधकांनी अल्ट्रासाउंडच्या मदतीने किण्वन पद्धत विकसित केली आहे. हे संशोधन 'बायोरिसोर्स टेक्नॉलॉजी' आणि 'अल्ट्रासोनिक्स सोनाकेमिस्ट्री' या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे. यामुळे केवळ मधुमेहाच्या रुग्णांवरच नव्हे तर एकूणच आरोग्यावर होणाऱ्या साखरेच्या दुष्परिणामांबद्दल जागरूक असलेल्या लोकांनासुद्धा याचा फायदा होईल. त्यामुळे, साखरेच्या सुरक्षित पर्यायाचा वापर वाढेल. संशोधक व्ही. एस.मोहोलकर म्हणतात की, नैसर्गिक पदार्थांपासून 'झायलीटॉल' हा साखरेला पर्याय ठरू शकणारा पदार्थ तयार केला आहे. या पदार्थामध्ये मधुमेहविरोधी, लठ्ठपणाविरोधी जीवाणू आहेत. त्याचप्रमाणे, पदार्थांत चांगल्या जीवाणूंचेही प्रमाण आहे. तो दातांचे झीज होण्यापासून रक्षण करतो. किण्वनाच्या पारंपरिक प्रक्रियेसाठी 48 तासांचा वेळ लागतो. मात्र, पदार्थाच्या निर्मितीवेळी किण्वन प्रक्रियेत अल्ट्रासाऊंडचा वापर केल्याने हा वेळ 15 तासांपर्यंत कमी झाला आहे. त्याचप्रमाणे, 'झायलीटॉल'च्या उत्पादनातही 20 टक्के वाढ झाली आहे. संशोधकांनी किण्वन प्रक्रियेत अल्ट्रासाऊंडचा वापर केवळ दीड तासच केला. या प्रक्रियेत अल्ट्रासाऊंडचा फारसा वापर न केल्याने उसाच्या बगॅसपासून उत्पादन होणाऱ्या या पदार्थामुळे भारतातील उस उद्योगापुढे एकीकरणाची संधीही निर्माण होऊ शकते, असेही ते म्हणाले. मात्र, सध्या हे संशोधन प्रयोगशाळेपुरते मर्यादित असून या पदार्थाचे व्यावसायिक स्तरावर उत्पादन करताना आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, असेही संशोधकांचे म्हणणे आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शाश्वत शिक्षणाची गंगोत्री



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**मुलं शाळेत आहेत. त्यांच्या निरागस चेहेऱ्यावर आनंद फुलला आहे. त्यामुळे ती जास्तच सुंदर दिसतात. आणि मी अविश्वसनीय नजरेने त्यांच्याकडे पाहतो आहे. असा अनुभव मला एका शाळेतील मुलं पाहताना आला. खरं तर बालपण आणि निरागसता, बालपण आणि निखळ आनंद, बालपण आणि सौंदर्य या गोष्टी तशा जोडीनेच असतात. पण अलीकडे त्या तशा दिसतीलच, तशा रूपात भेटतीलच याची खात्री देता येत नाही. कारण आजच्या शाळांनी, शिक्षकांनी, पालकांनी आणि अभ्यासक्रमाने मुळातच रम्य असणारे हे बालपण करपून टाकले आहे. हेतुपूर्वक नसेलही कदाचित. पण तसे घडते आहे एवढे मात्र खरे.**

या सगळ्या गोष्टींना अपवाद असणारी शाळा मला भेटली. या शाळेतील मुलांचे चेहरे जणू आनंदाने फुलले होते. एखाद्या उद्यानात बागडावे तशी ती मुले शाळेत हिंडत फिरत होती. कसला आनंद झाला होता त्यांना ? काही विशेष घडले होते का ? तसे काहीही झालेले नव्हते. त्यांचे चेहरेच त्या शाळेत कायम आनंदी होते. तो आनंद आतूनच फुलून आला होता. एखादे फूल पूर्ण उमलल्यानंतर जसे सुंदर दिसते, तसे त्यांचे चेहरे दिसत होते. आपली मुले शाळेत जायला नाखूष असतात. गेले तरी शाळा केव्हा सुटते असे त्यांना होते. शाळा सुटण्याचा कोण आनंद असतो..! जणू तुरुंगातून सुटलेले कैदीच ! पण याला अपवाद ही शाळा होती. इथे या शाळेत मुलांना सुटी नको असते. शाळेतच त्यांना राहायचे असते. शाळा सुटली तरी त्यांना त्याचा विशेष आनंद नसतो.

ही शाळा आहे शाश्वत स्कूल. अमरावतीला रहाटगाव रोडवर. या शाळेत इतर शाळांसारखे ठराविक वेळापत्रक नाही, ठराविक तासिका नाहीत. वर्ग आहेत, तासही होतात. पण ही शाळा विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देते. येथील शिक्षक नेहमीच्या पद्धतीने हातात पुस्तक घेऊन शिकवताना, अभ्यासक्रम पूर्ण करताना दिसत नाहीत. ते मुलांना स्वयं अध्ययनाची संधी देतात. त्यांचे अध्ययन अधिक प्रभावी आणि स्वावलंबी कसे होईल हे पाहतात.

शाळेचा परिसर मोठा रमणीय आहे. निसर्गसुंदर आहे. तेथील निसर्ग, वनस्पती, प्राणी हे मुलांचे सोबती आहेत. कोबड्या, बदके, मांजर, पोपट इ प्राणी मुलांसोबत मुक्तपणे बागडताना आपल्याला या शाळेत दिसतील. काही मुले आपल्याला मैदानावर खेळ खेळताना दिसतील. काही बागेत काम करताना दिसतील. त्यांच्यामागे कोणी शिक्षक नाहीत. कोणी त्यांच्यावर ओरडत नाहीये की असं करू नका, तसं करू नका. एक स्वयंशिस्तच मुलांच्या अंगी बाणलेली दिसते. शाळेचे आवार , व्हरांडा, वर्ग सारे काही स्वच्छ. सगळ्यांच्या चपला, बूट वर्गाबाहेर रांगेत काढलेले. एखादी दुसरी चप्पल चुकून इकडे तिकडे झाली तरी एखादा विद्यार्थी स्वतःच ती व्यवस्थित लावून ठेवेल. शाळेतील व्हरांड्यातील आणि वर्गातील भिंती बोलक्या. तिथल्या चिमुरड्यांनी केलेल्या विविध प्रोजेक्ट्स च्या साक्ष देणाऱ्या भिंती.

अशी शाळा असू शकते अशी मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. या शाळेची माहिती मला लोकसत्तेत आलेल्या एका लेखातून मिळाली. आणि तेव्हाच मी ठरवले की ही शाळा बघायला आपण जायचेच. त्या लेखाच्या शेवटी लेखकाचा इ मेल दिलेला होता. त्यावरून त्यांच्याशी संपर्क साधून शाळेचा पत्ता आणि फोन नं मिळवला. या शाळेचे संचालक अतुल गायगोले यांच्याशी संपर्क साधला. आणि त्यांना मला शाळा बघू देण्याची विनंती केली. त्यांनीही मोठ्या आनंदाने, ' सर, कधीही या. आपले स्वागत आहे. ' या शब्दात मला परवानगी दिली. मी त्यांच्या संपर्कात गेल्या सहा महिन्यांपासून होतो. पण जायचा योग येत नव्हता. पण २०२०च्या जानेवारी महिन्याच्या अखेरीस मला ही संधी मिळाली. आणि मी या शाळेत हजर झालो.



अतुल सरांनी मला स्टेशनवर घेण्यासाठी शाळेतीलच सचिन सावळकर यांना पाठवले. आणि माझी राहण्याची देखील व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी त्यांच्यासोबतच शाळेत दाखल झालो. पाहताच प्रेमात पडावे अशी ती शाळा होती. मी वर वर्णन केल्याप्रमाणे सगळी आनंदी, निरागस चेहऱ्याची मुले, मुली शाळेत बागडत होती. कोणीही त्यांच्यावर ओरडत नव्हते. ओरडायची गरजही नव्हती. जेव्हा एखादी गोष्ट आतूनच येते, तेव्हा ती सांगावी लागत नाही. खर तर शिक्षणक्षेत्रात ३५ वर्षे काम करून सेवानिवृत्त झालेल्या माझ्यासारख्या शिक्षकाला हा आश्चर्याचा धक्काच होता. त्यामुळे मी वेगवेगळ्या पद्धतीने माझ्या नजरेतून ही शाळा पारखून पाहिली. पण सगळ्या कसोट्या अपूर्ण पडल्या. शाळा या सगळ्या मापदंडात बसणारी नव्हती. किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्या सगळ्या कसोट्याना पुरून उरणारी होती.

या शाळेत प्रत्येक वर्गात साधारण २२ ते २५ मुले आहेत. त्यांच्यासाठी एक शिक्षक. मुख्याध्यापक नाही. शिक्षकांना मुख्याध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांना शिक्षकांचे बॉसिंग नाही. धाक, दडपण,भीती यापासून मुक्त असलेली ही शाळा आणि तिथली मुले. जणू रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेतील ' स्वातंत्र्याचा स्वर्ग ' इथे अवतरलेला. मुले प्रयोगातून शिकतात. शिक्षक त्यांना शिकण्यासाठी मदत करतात.

के जी ते १० वी पर्यंत ही शाळा सध्या आहे. मुलांना शिकण्यासाठी प्रोजेक्टच असे दिले जातात की मुले जीव ओतून ते पूर्ण करतात. ते पूर्ण करता करता शिकतात. येथील प्रयोगशाळेत मुले स्वतः प्रयोग करतात. मोठ्या वर्गातील मुले लहान वर्गातील मुलांना शिकण्यासाठी मदत करतात. मुलांवरच जबाबदारी टाकल्याने ती जबाबदारीनेच वागतात.

या शाळेतील के जी च्या मुलांच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन ९ वी च्या विद्यार्थ्यांनी केले. अगदी कार्यक्रमासाठी हॉल बुक करण्यापासून ते पालकांना निमंत्रण देण्यापर्यंतचे सगळे नियोजन त्यांनी केले. मी एका दुसरीच्या वर्गात गेलो. तेथील विद्यार्थ्यांना पाणी या विषयावर अभ्यास करायला सांगितले होते. पण पाणी या शब्दाऐवजी त्यांना एच टू ओ हा शब्द कार्यासाठी दिला होता. या विषयावर फक्त दुसरीत असलेल्या त्या विद्यार्थ्यांनी अक्षरशः प्रचंड माहिती गोळा केली होती. ती मुले मला ती समजावून सांगत होती. इंग्रजीत लिहिलेली ती माहिती खडानखडा वाचून दाखवीत होती. मी मुद्दामच मला काही कळले नाही असे दाखवले. त्या मुलांनी मग मला ती माहिती मराठीतून सांगितली. पाणी किती मौल्यवान आहे हे त्या मुलांना कळले होते. आता त्यांना पाणी जपून वापरा हे सांगावे लागणार नव्हते. हे खरे शिक्षण. व्हरांड्यात काही पाचवीची मुले शिष्यवृत्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका सोडवीत बसली होती. ती शांततेने आपली उत्तरे लिहीत होती. येत नाही म्हणून शेजारच्या मुलाला विचारत नव्हती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तेथे कोणीही शिक्षक उपस्थित नव्हते. त्यांना पर्यवेक्षणाची गरज नव्हती. या शाळेची सगळी मुले शिष्यवृत्ती परीक्षेला बसतात आणि ८० % मुले गुणवत्तेत उत्तीर्ण होतात. सगळ्याच स्पर्धा परीक्षांबद्दल ही परिस्थिती आहे. शाळेच्या परिसरात असलेल्या जमिनीत मुले भाज्या पिकवतात. ' फार्म टू प्लेट ' असा त्यांचा हा प्रकल्प. भाज्या नुसत्या घ्यायच्या नाहीत. तर त्या शिजवण्यापासून ताटात वाढण्यापर्यंत सगळ्या गोष्टी शिकण्यासाठी हा प्रकल्प. ' बेकींग इंग्लिश ' हा ही असाच एक प्रकल्प. येथे मुले पदार्थ बनवतानाच सायन्स, इंग्लिश सहज शिकतात. या शाळेतील तिसरीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः चित्र काढून आणि माहिती लिहून ' INSECTS ' विषयावर इतके अप्रतिम पुस्तक तयार केले आहे की आपल्या शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा असे पुस्तक तयार करता येईल का याची शंका वाटते.

मी शाळेत गेलो त्या दिवशी संध्याकाळी त्या शाळेतील ७ वीच्या विद्यार्थ्यांना तान्हाजी हा चित्रपट पाहण्यासाठी नेले गेले. मी ही त्यांच्यासोबत गेलो. मुलांनी अतिशय शिस्तीत चित्रपट एन्जॉय केला. पण दुसऱ्या दिवशी तो चित्रपट पाहिल्यानंतर त्या मुलांना २५० ते ३०० शब्दात त्या चित्रपटाचे परीक्षण लिहायला सांगितले गेले. त्यातील मानवी मूल्ये, आपण त्यातून काय शिकतो हे त्यांना विशेषत्वाने विचारले गेले. मुले घडतात ती अशी. मुलांसमोर नुसती भाषणे देऊन किंवा त्यांना सारख्या सूचना देऊन आपण फार काही सध्या करू शकत नाही.

विशेष म्हणजे या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशाची सक्ती नाही. फक्त आठवड्यातून एक दिवस ते गणवेश घालून येतात. या शाळेतील बऱ्याच म्हणजे जवळपास ९९% विद्यार्थ्यांनी गेल्या दिवाळीत नवीन कपडे घेतले नाहीत किंवा पालकांकडे फटाक्यांसाठी हट्ट केला नाही. कारण त्यांना समजले की आपल्याला भरपूर कपडे असताना नवीन कपडे घेण्याची आवश्यकता नाही. तसेच पर्यावरणाबद्दल फक्त शाळेत न शिकता ते व्यवहारात आणले पाहिजे म्हणून फटाके फोडायचे त्यांनी नाकारले. विद्यार्थ्यांकडे आताही दप्तराचे ओझे फार कमी असते. तरीही २०२१ पासून ही शाळा पूर्णपणे दप्तर विरहित करण्याचे संचालक अतुलजींनी ठरवले आहे. तसेच शाश्वत इंडिया फेलोशिप ही त्यांची महत्वाकांक्षी योजना आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, संविधानातील तरतुदी, घटनात्मक अधिकार, हक्कांबरोबरच कर्तव्याची जाणीव आणि जैवविविधतेतील परस्पर पूरक संबंध यांचे भान विद्यार्थ्यांना यावे हा व्यापक उद्देश यामागे आहे. यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा पी एच डी च्या शिक्षणापर्यंतचा पुस्तकांचा खर्च शाळेमार्फत केला जाईल. या शाळेतील तिसरीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः चित्र काढून आणि माहिती लिहून ' INSECTS ' विषयावर इतके अप्रतिम पुस्तक तयार केले आहे की आपल्या शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा असे पुस्तक तयार करता येईल का याची शंका वाटते. ही शाळा दाखवण्यासाठी अतुलजींनी ४/५ विद्यार्थी आमच्यासोबत दिले होते. ते अतिशय आत्मविश्वासाने आपल्या शाळेबद्दल भरभरून बोलत होते. माझ्यासोबत काही पालकही शाळा बघायला आले होते. त्या पालकांच्या प्रश्नांनाही या विद्यार्थ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

या शाळेतील सगळ्याच गोष्टींचा आणि प्रयोगांचा आढावा या लेखात घेणे शक्य नाही. पण या सगळ्याचे श्रेय त्या ठिकाणी समर्पित भावनेने आणि कल्पकतेने काम करणारे अतुल गायगोले, त्यांच्या पत्नी अमृता, शिक्षकवर्ग आणि इतर कर्मचारी या सगळ्यांना आहे.

मी दोन दिवस पूर्ण वेळ या शाळेत राहिलो आणि भरभरून ही विद्येची गंगोत्री माझ्या तनामनात साठवून घेण्याचा प्रयत्न केला. मी इथे गंगोत्री हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे. गंगेचा उगम असतो छोटाच, पण शुद्ध आणि निर्मळ .उगमाजवळ शुद्ध आणि निर्मळ असलेली गंगा जसजशी पुढे जाते, तिला अनेक नद्या येऊन मिळतात. आणि तिचे स्वरूप विशाल होत जाते. काठांवरच्या गावांना ती समृद्ध करत जाते. पण आज आपल्याकडील शिक्षणाची गंगा मलीन झाली आहे. तिला शुद्धीकरणाची गरज आहे. या शाश्वत कन्सेप्ट स्कूलच्या स्वरूपात उगम पावलेली गंगोत्री मात्र या मलीन शिक्षणक्षेत्राला आपले हरवलेले पावित्र्य आणि आत्मा पुन्हा मिळवून देईल. गरज आहे ती अशा शाश्वत शाळेला बळ देण्याची. मग खुशाल कालवे काढा आणि या मातीला सुजलाम सुफलाम बनवा.

# गुरु ग्रहाची कडी कधी बघितली आहेत का ?

आधुनिक केसरी

**गुरु ग्रह म्हटलं की पिवळा-लाल रंगाचे पट्टे असलेला ग्रह डोळ्यासमोर येतो. तसंच या ग्रहाचे छायाचित्र बघितले की यावर असलेला लाल रंगाचा ठिपकाही कायम लक्षात रहातो. हा ठिपका म्हणजे गुरु ग्रहावरील एक प्रकारचे वादळ असून दोन पृथ्वी मावतील एवढा त्याचा आकार आहे. जेम्स वेब टेलिस्कोपच्या Near-Infrared Camera ने काढलेल्या छायाचित्रांमुळे गुरु ग्रहाचे अनोखं असं दर्शन होत आहे. यामुळे निळा, हिरवा, पांढरा, पिवळा, नारंगी अशा रंगांच्या छटा असलेल्या गुरु ग्रह बघायला मिळत आहे.**

आपल्या सूर्यमालेत सर्वात आकर्षक असा दिसणारा ग्रह कोणता असेल तर कदाचित अनेक जणांचे उत्तर हे शनी ग्रह असंच असेल. शनीला असणाऱ्या कड्यांनी (ज्यांची प्रत्यक्षात संख्या मोठी आहे) या ग्रहाचे वेगळेपण कायम लक्षात रहाते. मात्र सूर्यमालेतील सर्वात अवाढव्य गुरु ग्रहालाही शनीसारखी कडी आहेत असं सांगितलं तर अनेकांचा त्यावर विश्वास बसणार नाही, बहुसंख्य लोकांना याची माहिती नसेल. परंतू नासाने (NASA) ने नुकतीच गुरु ग्रहाची काही छायाचित्रे प्रसिद्ध केली आहेत त्यामध्ये ही कडी स्पष्टपणे दिसून येतात. गॅलिलीओने जेव्हा १६१० ला दुर्बिण रोखली तेव्हापासून शनी ग्रहाला कडी असल्याचं माहित झालं होतं. त्यानंतर कित्येक वर्षे गुरु ग्रहाचाही अभ्यास केला जात होता पण त्याला कडी आहेत हे माहित नव्हते. १९७९ ला जेव्हा नासाचे Voyager 1 नावाचे यान हे गुरु ग्रहाजवळून गेले तेव्हा या ग्रहालाही कडी असल्याचं लक्षात आलं. अर्थात ज्या प्रमाणे शनी ग्रहाची कडी ही सहज दिसून येतात तसं गुरु ग्रहाच्या बाबतीत होत नाही. एकतर एखाद्या यानाने गुरु ग्रहाजवळून विशिष्ट कोनातून छायाचित्रे काढली तरच गुरुच्या कडींचे दर्शन होते. किंवा शक्तीशाली दुर्बिणीच्या सहाय्याने बघितले तरच ही कडी दिसून येतात. नासाने अशीच काही छायाचित्रे आता प्रसिद्ध केली आहेत. काही महिन्यांपूर्वी अवकाशात पाठवलेल्या 'जेम्स वेब टेलिस्कोप'(JWST)ने पृथ्वीपेक्षा आकाराने हजारपट मोठा असलेल्या गुरु ग्रहाची अप्रतिम छायाचित्रे काढली आहेत.

गुरु ग्रह म्हटलं की पिवळा-लाल रंगाचे पट्टे असलेला ग्रह डोळ्यासमोर येतो. तसंच या ग्रहाचे छायाचित्र बघितले की यावर असलेला लाल रंगाचा ठिपकाही कायम लक्षात रहातो. हा ठिपका म्हणजे गुरु ग्रहावरील एक प्रकारचे वादळ असून दोन पृथ्वी मावतील एवढा त्याचा आकार आहे. जेम्स वेब टेलिस्कोपच्या Near-Infrared Camera ने काढलेल्या छायाचित्रांमुळे गुरु ग्रहाचे अनोखं असं दर्शन होत आहे. यामुळे निळा, हिरवा, पांढरा, पिवळा, नारंगी अशा रंगांच्या छटा असलेल्या गुरु ग्रह बघायला मिळत आहे. तसंच ऐरवी लाल रंगाचा ठिपका या छायाचित्रांच्या माध्यमातून चक्क पांढरा दिसत आहे. एवढंच नाही तर अशा प्रकारची



लहान पण असंख्य वादळे गुरु ग्रहावर असल्याचंही यामुळे दिसून येत आहे. तेव्हा वेगळ्या फिल्टरच्या माध्यमातून काढलेल्या या छायाचित्रांमुळे गुरु ग्रहाचा आणखी अभ्यास करण्यास एकप्रकारे अभ्यासकांना मदत होणार आहे.

या छायाचित्रातून ग्रहाभोवती असलेल्या कडी बघायला मिळत आहेत. अर्थात शनी ग्रहाप्रमाणे कडींची संख्या कमी असल्याने त्यांचे अस्तित्व जाणवत नाही, किमान या छायाचित्रामुळे ते जाणवते. ही कडी गुरु ग्रहापासून ९० हजार किलोमीटर ते दोन लाख २५ हजार किलोमीटर एवढ्या अंतरावर पसरली आहेत. ही एकच कडी नसून चार वेगवेगळ्या थरांमध्ये या कडींचे अस्तित्व आहे. ही कडी म्हणजे धूली कण आणि बारीक आकाराचे लघुग्रह-दगड यांचे मिश्रण आहे. ही कडी जरी छायाचित्रात कमी आकाराची-विरळ वाटत असली तरी प्रत्यक्षात काही किलोमीटर आकाराची रुंद आणि जाड आहेत.

गुरु ग्रह अवाढव्य आकाराचा असल्याने त्याचे ध्रुवही काही पृथ्वी मावतील एवढ्या आकाराचे आहेत. या ध्रुवांवर पृथ्वीप्रमाणे दिसणारा Aurora ( ध्रुवावर आकाशात दिसणारा विशिष्ट प्रकारचा प्रकाश) दिसून येतो. हा प्रकाश प्रत्यक्ष गुरु ग्रहाच्या ध्रुवांवर कित्येक किलोमीटर पसरला असणार हे स्पष्टपणे जाणवते. एवढंच नाही तर हा प्रकाश गुरु ग्रहाच्या अवकाशातही परावर्तित होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तसंच या छायाचित्रांमध्ये गुरु ग्रहाच्या ८० चंद्रांपैकी दोन चंद्रही स्पष्टपणे दिसून येतात. 'जेम्स वेब टेलिस्कोप' ही दुर्बिण नासा, कॅनडा स्पेस एजन्सी आणि युरोपियन स्पेस एजन्सी यांनी संयुक्तपणे उभारली आहे. अवकाशातील विविध खगोलीय गोष्टींचा खजिना या दुर्बिणीच्या माध्यमातून उलगडवला जात आहे. गुरु ग्रहाचे ही छायाचित्रे त्याचीच एक झलक आहे.

**-सूर्यकांत जाधव, मुंबई**

# गावाकडचा बैल पोळा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**औंढ्याच्या माळाच्या कुशीतलं आमचं गोजेगाव म्हणजे निसर्ग देवतेनं सहस्त्र हातांनी रंगीबेरंगी उधळण करून फुलवलेलं जणू नंदनवनच ! वरून खंडोबाचा माळ, पश्चिमेकडं छोटासा तलाव आणि पूर्व-दक्षिणेला विस्तीर्ण पठाराने नटलेला हा सुंदर परिसर ! विविधतेने श्रृंगारलेल्या परिसराला लांबचलांब डोंगरांची मनमोहक माला सर्वकाळ सुशोभित करते ! इथं कुणीही आलं की त्याला भुरळ पडल्याशिवाय रहात नाही ! जसा परिसर तशीच इथली संस्कृती, सणसमारंभ आणि माणसं सुद्धा ! इथली पंचमी असो की पोळा, सारं अगदी अविस्मरणीयच !**

पोळा तर फारच मजेशीर ! आम्ही लहान असतांना पोळ्याची लय मज्जा ! "पंचमीची लाही अन पोळ्यानं केली घाई !" या झोक्यावरच्या गाण्यानं सुरु व्हायचा पोळा ! पोळा आला हे लगेच कळायचं, कारण बुजुर्ग लोकांच्या एका हातात पांढऱ्या-रंगीबेरिंगी सुताचे बंडलं अन दुसऱ्या हातात सुत कातायचं भिरभिरं म्हणजे भेरा असायचा. पाऊस पडल्यामुळं वावरात वळाण्या नसायच्या. सगळे शेतकरी दुपारी बैल चारून आले, कि वाटेवर लांबच्या लांब सुताचे बंडलं घेऊन चाळवीत आणि सुताचा गुंता काढून भेऱ्यावर कातून, घट्ट पीळ देऊन गुंडाळून ठेवत. भेऱ्यावर कातलेल्या त्या रंगीबेरंगी सुताचा बैलांचा साज जसं यसनी, गोंडे, मथाट्या, सर, कासरे आणि मोहरक्या करायचा कार्यक्रम सुरु व्हायचा. हे सर्वच शेतकऱ्यांना जमायचं नाही. त्यात आमचे ज्ञानदादा-नामादादा यसणी अन मोहरक्या करण्यात तरबेज, त्यामुळं या काळात बिचारे दादा रात्रंरात्रं जागून लोकांच्या बैलांचे साज करून द्यायचे. तो काळंच वेगळा होता ! माणसं परिस्थितीनं गरीब होती पण मनानं श्रीमंत होती! एकमेकांना एकमेकांसाठी वेळ होता. माणसांना प्राण्यांसाठी वेळ होता आणि प्राणीही माणसांना जीव लावायचे अगदी माणसासारखा!

गावाकडचा पोळा तसा तीन दिवसांचा सण ! आधल्या दिवशी खांदेमळन ! एकाजणाने बैल चारून-धुऊन आणायचे. माळाऊन येतांना पळसाचे चार-दोन मूळं काढून, ते भाजून-ठोकून त्याचे बैलांना चौरं बनवायचे. एखादं लांब मूळ सापडलं, की दादा मला त्याचा चाबूक करून द्यायचा. तो काड्कन वाजायचा ! एकदा वाजवता वाजवता पागुरा माझ्याच पायावर बसला ! चांगलीच आग झाली, एवढामोठा वळच आला ! तिकडं दुसऱ्या दादानं नदीला जाऊन मोळ अन पळसाचा पाचपाण्या डहाळा आणायचा. संध्याकाळी मोठ्या वाटीत गायीचं दुध-लोणी-हळद टाकून मोळ-डहाळ्यानं घट्ट कालवून घ्यायचं. मी, नामादादा, सुदादा, मुरलीदादा गोठ्यात जाऊन घट्ट दुधाने पिल्या-पाखऱ्या, पदम्या-कंबळ्या या चार बैलांचे खांदे मळायचो. खांदे मळनाराला एकानं विचारायचं, "काय करायला ?" त्यानं खांदा मळत मळत "पिल्याचा खांदा मळायलो !" असं उत्तर द्यायचं. असं तीन तीन वेळा झालं की, त्या बैलाचं नाव घेऊन त्याच्या कानात "आज आवतन, उद्या जेवायला आहे हो !" असं जोरात सांगून सोबत नेलेली पितळची परात त्या बैलाच्या कानात वाजवायची. खांदे मळणीचा जेवायचा बेतही विशेषच ! वरण-फळं, त्यावर घरचं तूप अन सोबत गावरान मिरचीचा झणझणीत ठेचा ! लय मज्जा यायची !

पहाटेपासूनच पोळ्याची लगबग सुरु व्हायची ! माय-बाबा-भाबी घरची तयारी करायचे. वावरात जाऊन बाबा जू आणायचे. आम्हाला खंडोबा, मसोबा, मुंज्या, असराया, वावरातला खंडोबा या सगळ्या देवांना शेंदूर लावणे आणि नारळ फोडण्याचे काम ! घंट्यादिडघंट्यात पळतपळत ते काम संपवून आम्ही घरी हजर ! पोळ्याची खरी तयारी सुरु व्हायची दोन-अडीच वाजल्यापासून! आपापल्या गोठ्यासमोर लोकं बैल सजवायचे. स्वच्छ धुऊन आणलेले बैल मस्त दिसायचे ! शिंगं व्यवस्थित करून शेपूट-गोंडे करायचे. शिंगांना वारणीस अन त्यावर रंगीबेरंगी बेगडं लावायचे. शिंगाला चौरं, शेंगुळे, नाडा-पुडी बांधायची, गळ्यात घागरमाळा, अन पाठीवर झुली ! कुणीकुणी बैलांच्या शिंगात फिरते फुलं-फुगे लावायचे ! पोळा म्हणजे बैलांचं लग्न ! बैलांच्या कपाळावर आरशाचे बाशिंगं उठून दिसायचे ! प्रत्येक बैल नवरदेवासारखा छान सजलेला ! बैलाच्या पाठीवर हळदी-कुंकवाचे छापे मारायचं काम माय-भाबी करायच्या ! तिकडं दारात एक बाज, त्यावर एक चादर टाकलेलं, त्यावर काव-चुन्यानं रंगवलेलं जू अन हारा-डेरा ! सारवलेल्या घराच्या दोन्हींकडून काव-चुन्याचे ठिपके दिलेले ! आत-बाहेर शेणामातीनं सारवलेलं घर अक्षरशः सजून जायचं ! एक वेगळाच, लगन घरासारखा गंध यायचा घराला ! तिकडं सगळे बैलाच्या साजात गुंग ! कामावरच्या सालगड्याला मालक नवे कपडे घ्यायचा. सायंकाळी पाच पर्यंत सगळे लोकं सजून-धजून, बाया-पोरं नटून-थटून तयार ! बुजुर्ग लाल-पिवळे-पांढरे



पटके (फेटे) बांधून पाटीलकीच्या थाटात पाराकडं यायचे ! आम्ही बैल धरू द्या म्हणून रडायचो, पण पोळा फिरतांना एखादं लेकरू तुडवल म्हणून आम्ही पाराच्या किंवा गुरुबुवाच्या वट्यावर बाबासोबत उभे रहायचो. बैल धरू दिला नाही म्हणून आमचा हिरमोड व्हायचा ! गावातील मानकरी-पाटील आणि सर्वांचे बैल पाराच्या भोवताल आले की; अक्षता वाटल्या जायच्या. बैलांचं लग्न सुरु व्हायचं ! लोक जोरजोरात मंगलाष्टक म्हणायचे ! पोस्टमास्तर बबनदा, उत्तमदा, नाजुकदा, आमचे मोठे राधोजीदादा, नामादादा मंगलाष्टकं म्हणायचे ! शेवटी "आता सावध सावधान" होऊन पोळा फुटायचा ! बैल फिराय सुरुवात व्हायची ! काही लोक बैल फिरवतांना घाई करायचे, अक्षरशः बैलांना काठ्यांनी मारायचे ! भोवताल उभे असलेले मालक-लोक "अरे, बैलांना मारू नका रे !" "हळू-हळू फिरवा रे !" असे जोरजोरात ओरडायचे. पाराच्या भोवताल सगळा राडा सुरु व्हायचा! लोकांचे कपडे शेणानं भरायचे ! सगळीकडं धावपळ !

प्रदक्षिणा घालून दादा बैलं दारांत घेऊन यायचा, आम्ही शेपटीसारखे मागच ! माय-भाबी बैलांना आणि दादांना ओवाळायच्या ! त्यात आमचाही नंबर लागायचा ! बैलांच्या पायाची पूजा करून त्यांना पुरण-पोळीचा निवद खाऊ घालायचा! कधी-कधी एखादा बैल रुसायचा ! पुरण-पोळी खायचाच नाही ! मग दादा हळूच त्याच्या पाठीवून हात फिरवून त्याची समजूत-रुसवा काढायचा ! अन आश्चर्य म्हणजे लगेच बैल निवद खायचा ! कोण म्हणतं, प्राण्यांना भावना नसतात ? बैलांना निवद खाऊ घालतांना माय-बाबांचे डोळे भरून यायचे ! त्यांना वाईट दिवसांची आठवण व्हायची ! सगळं भावनिक वातावरण व्हायचं! नंतर आम्ही मोठादादा, कुंडलिकदादा अन ज्ञानदादाच्या घरी बैल घेऊन जायचो ! तिथं बैलांची पूजा व्हायची ! त्यानंतर बैल गोठ्याच्या समोर बांधून आम्ही सगळेच घरी यायचो.

त्यानंतर मात्र आणखीच मज्जा यायची ! आमच्या गावात पोळ्याच्या दिवशी सगळ्या गावात घरोघर जाऊन पाया पडायची प्रथा आहे ! त्यात आम्ही लहान पोरं-सोरं आघाडीवर ! गावातल्या सगळ्या घरी पाया पडायला जायचं ! घरातील मोठे बुजुर्ग स्त्री-पुरुष पाया पडलं की, लहान पोराला नारळाचा कुटका, मोठ्या माणसांना करदोडा द्यायचे. त्यात आम्ही बळच करदोडा मागून घ्यायचो. कुणी द्यायचं तर कुणी, "चला पळा !" म्हणून काढून द्यायचे. हे पाया पडणं विशेष ! कुणाचा रुसवा-फुगवा, भांडण झालं असलं किंवा बोलणं-भाषण बंद असलं तर आजच्या दिवशी सर्वांना माफ करून पुन्हा नव्यानं संबंध जोडले जायचे ! मनातील कटुता धुऊन टाकली जायची ! सगळ्या लेक, सुना, चुलते, काका मोठ्यांच्या पाया पडायचे ! सगळं घर गजबजून जायचं ! पाया पडणं झालं की, आम्ही चारपाच भाऊ अन बाबा जेवायला बसायचो. चांगली भूक लागलेली असायची ! पुरण-पोळी आणि त्यावर गावरान तूप ! गप्पा मारत, हसत-खेळत मस्त जेवणं व्हायचे. माय अन भाबी आग्रह करू करू वाढायच्या ! पुरणपोळी सारखं गोड वातावरण तयार व्हायचं ! पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी नामादादा आणि गावातील पाच-पन्नास जन आपल्या बैलजोड्या वाईला गोरक्षनाथाच्या दर्शनाला घेऊन जायचे ! बैलांची वाईची वारी झाली की पोळा संपायचा ! पंचीमी-पोळ्याचे दिवस भुर्रकन उडून जायचे आणि शेतातील कामाची लगबग सुरु व्हायची.

आज मागे वळून पाहतांना सगळंच बदललंय ! ते जग अन जगणं बरंच रिकामं-रिकामं झालंय ! सगळ्यांची घरं मजबूत-सिमेंटची झालीत, पण त्यातील माय-बाबा अन मातीचा ओलावा संपलाय ! गावाकडं आता माय-बाबा नाहीत ! पट्कन गावाकडं पाय वळत नाहीत ! पाणी भरपूर आहे पण सगळं कसं आटल्या सारखं झालंय! दोन मोठ्या दादांचा प्रवास केंव्हाच थांबलाय! आता आम्ही केवळ पाचच आहोत ! सगळ्यांना घरं आहेत, मात्र आपापल्या घरात दोघंच आपल्या लेकरांसोबत पुरण-पोळी खाताहोत, पोळा मात्र नाही !

मनात आठवणींचे पक्षी
हळूच घिरट्या घालतात
येतील का पुन्हा ते दिवस ?
स्वतःच स्वतःशी बोलतात

सगळं आहे पण ती पोळ्याची लगबग, धावपळ, तो काव-चुन्याचा, सारवणाचा सुगंध अन ती नारळाची चव कुठंच शिल्लक नाही आठवणीं शिवाय !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# हिंदी चित्रपटसृष्टीतील अविवाहित अंकल - डेव्हिड अब्राहम चेउलकर



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**डेव्हिड अंकल नावाने ओळखले जाणारे डेव्हिड अब्राहम चेउलकर चरित्र अभिनेता म्हणून आपली वेगळी छाप चित्रपटसृष्टीत टाकली होती. सगळ्यांना आवडणारे विनम्र अंकल अशी त्यांची ओळख होती. चित्रपटसृष्टीत अनेक कलाकारांना पदार्पणातच वयस्क भूमिका वाट्याला आल्या पण आपल्या अभिनय कौशल्य व वेगळेपणामुळे त्यांनी आपली छाप टाकली. त्यातील एक डेव्हिड अंकल. अनेकदा फक्त डेव्हिड किंवा अंकल डेव्हिड म्हणून ओळखले जाणारे, डेव्हिड अब्राहम चेउलकर ११० हून अधिक चित्रपटामध्ये दिसले. त्यांची कारकीर्द चार दशकाहून अधिक आहे. दयाळू आणि विनम्र व्यक्तिरेखा त्यांनी अजरामर केल्या.**

डेव्हिड अब्राहम चेउलकर वडील अब्राहम तर आई दिनाह चेउलकर मराठी भाषिक बेने इस्राएल समुदायाचे होते. १९३० ला मुंबई विद्यापीठातून कला शाखेची पदवी मिळवली. नोकरी मिळवण्यासाठी सहा वर्षाच्या अयशस्वी संघर्षानंतर त्यांनी व्यावसायिक अभिनेता म्हणून हिंदी चित्रपट उद्योगात आपले नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला. या वर्षांच्या संघर्षात त्यांनी सरकारी विधी महाविद्यालयातून कायद्याची पदवीही मिळवली. शेवटी, १५ जानेवारी १९३७ रोजी, त्याचा जवळचा मित्र नायमपल्ली, एक ज्येष्ठ चरित्र अभिनेता याच्या मदतीने, त्याने चित्रपटात पहिली भूमिका साकारली. हा चित्रपट झांबो होता, आणि तो भारत सरकारच्या चित्रपट विभागाचे मुख्य निर्माते मोहन भवनानी निर्मित आणि दिग्दर्शित करत होता.

डेव्हिड यांनी अनेक चरित्र भूमिका साकारल्या पण सर्वाधिक लक्षात राहिल्या त्या बूट पॉलिश (१९५४), चुपके चुपके (१९७५) गोलमाल (१९७९) बातों बातों में (१९७९) इत्यादी. बूट पॉलिश मधील "जॉन चाचा" हे चरित्र भूमिका खूप गाजली होती. या भूमिकेसाठी डेव्हिड यांना १९५५ ला फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता. त्यांच्यावर चित्रित केलेले "नन्हे मुन्ने बच्चे तेरी मुट्ठी में क्या है" हे गाणे त्या काळातील एक अविस्मरणीय गाणे ठरले होते.

डेव्हिड यांच्या मुख्य काळात, १९५९ ते १९७५ या कालावधीत, प्रमुख पुरस्कार शो आणि इतर कार्यक्रमाचा डेव्हिड हा एक सर्वोत्कृष्ट आणि सर्वात सुप्रसिद्ध अँकर होता. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या एका भाषणात म्हणाले की, डेव्हिडच्या भाषणाशिवाय कोणतीही घटना निश्चितच अपूर्ण असेल. डेव्हिड यांचा आयपीटीए या नाट्य



संस्थेत ही सक्रिय होते.

संघर्षमय जीवनामुळे डेव्हिड यांना लग्न करता आले नाही. जीवनाचा शेवट ही त्यांचा आर्थिक संघर्षाचाच गेला. शेवटी त्यांनी भारत सोडून कॅनडा येथे आपल्या नातेवाईकांत आश्रय घेतला आणि कॅनडा येथेच वयाच्या ७२ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. पण डेव्हिड अंकल हे कायमस्वरूपी प्रेक्षकांच्या हृदयात राहिले. या दयाळू आणि विनम्र अंकलला माझा सलाम.

# खेळाच्या माध्यमातून मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवून ठेवणे ही पालकांची जबाबदारी



पुनम सोनवणे
शारीरिक शिक्षण शिक्षिका, नाशिक

आधुनिक केसरी

**नाशिक-आजच्या धावपळीच्या युगात स्वतःला व मुलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सदृढ ठेवणं ही सुद्धा तारेवरची कसरत आहे असं म्हटलं तर अजिबात वावगं ठरणार नाही त्याचं कारण म्हणजे वाढते आधुनिकीकरण, वाढती स्पर्धा, वाढत्या आरोग्याच्या समस्या, तंज्ञानामुळे निर्माण झालेल्या आरामदायी जीवनशैलीचा अती अंगीकार व त्याचबरोबर मोबाईलचा अतिवापर अशा विविध समस्यामुळे २१ व्या शतकातील मानवाचं आरोग्य हे सतत चिंताजनक होत चाललेलं आहे.**

खरंतर आधूनिकीकरणामुळे मोटासायकलचा विकास आणि त्यामुळे मानवाची चालण्याची सवय सुध्दा हळूहळू कमी होतांना दिसते, मोबाईलमुळे मैदानावर खेळण्याची सवय कमी झाली. लिखाणाची सवय कमी झाली अशा कित्येक समस्या आजच्या २१ शतकाच्या युगात निर्माण होऊ लागल्याने भविष्यात मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य टिकेल का..? हा मोठा प्रश्न समोर आहे आणि ते टिकवून ठेवणे ही पालकांसाठी किती तारेवरची कसरत असेल याचा अभ्यास करणं महत्वाचं वाटतं. आज जर मुलांच्या शारीरिक व मासनिक आरोग्याकडे दुर्लक्ष केलं तर पालकांना भविष्यात तारेवरची कसरत ही फार अवघड असेल आणि ती त्या वेळेस करावीचं लागेल कारण दिवसेंदिवस नवनवीन रोगांचा जन्म आणि त्याचा प्रादुर्भाव हा त्यांच्या आरोग्यासाठी अतिशय घातक असेल म्हणून पालकांनी आजचं आपल्या मुलांच्या आरोग्याकडे लक्ष देण्याचे गरज आहे.



खेळ म्हणजे नुसतं मनोरंजनाचे साधन नव्हे तर भविष्यातील प्रगती साधणारे साधन म्हणून पाहावे खेळ हा जीवनाचा पाया सक्षम बनविणारा मूलभूत असणारा उपक्रम आहे. त्यात शारीरिक, मानसिक भावनिक, सामाजिक व बौद्धिक विकास होत असल्याने भविष्यातील स्वयं विकास हा निरंतर व सातत्यपूर्ण होत असतो त्यामूळे मुलांच्या खेळाकडे दुर्लक्ष करणं म्हणजे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे, खरंतर आजच्या मुलांना मोबाईल पासुन दूर ठेवत मैदानावर जाण्याची सवयी लावून पालकांनी त्यांचा शारीरिक व मानसिक विकास साधून घेतला पाहिजे, त्याचबरोबर पारंपारिक, मनोरंजनात्मक खेळ असो किंवा ऑलिम्पिक खेळ असो अशा विविध खेळात मुलांना सहभागी करुन त्यांना मनसोक्त आनंद घेऊ देण्याची सवयी त्यांना लावल्या पाहिजेत कारण शालेय स्तरावरच्या पाठीवरील दप्तराच्या ओझ्यामुळे त्यांना मानसिक ताणतणावाच्या समस्या निर्माण होतात आणि त्या खेळामुळे सहज दूर करता येतात अशा विविध प्रकारच्या उपाययोजनांमुळे त्यांच्या शारीरिक क्षमतेचा विकास होत असतो, त्यांना आंनददायी जीवनशैलीची सवय लागते, त्यामुळे पालकांनी खेळाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक ठेवून मुलांचा सर्वांगीण विकास कसा साधला जाईल याकडे अधिक लक्ष देण्याची गरज असेल. आज मुलांमध्ये वाढत्या वजनाच्या समस्या, हृदय, रक्तदाबाच्या समस्या व इतर काही समस्या जर पाहिल्या तर चिंताजनक आहेच व भविष्यातील त्या मुलांचे आरोग्य कसे असेल हे सांगता येणं सुध्दा कठिण आहे, त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांच्या आरोग्याविषयी अधिक जागृत होत मुलांना शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी त्यांना दररोज किमान एक किंवा दोन तास मुलांना मैदानावर खेळण्याची संधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे आणि ही पालक म्हणून आपली प्रथम जवाबदारी असेल असं मला वाटतं. मुलांच्या मूलभूत हालचालींचा व कारक कौशल्याचा विकास हा योग्य त्या वयातचं साधला गेला पाहिजे त्याचबरोबर त्यांना आनंदी जीवनशैलीचा अंगीकार करता येईल अशा बाबतीत त्यांना सक्षम होण्यासाठी मदत करणे ही आपली प्राथमिकता असेल म्हणून मुलांना मैदानावर जाऊ द्या, खेळू द्या, आनंद घेऊ द्या कारण मुलांचा आनंद हाचं त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असेल.

# पत्रकाराच्या एकीची वज्रमूठ करणारे संजयजी भोकरे



वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई.

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातही जागतिकीकरणानंतर वृत्तपत्राबरोबरच विविध प्रकारची प्रसारमाध्यमे विकसित झाली. वृत्तपत्र व्यवसायात भांडवलदार, मोठे उद्योग समूह आल्याने शहर, जिल्हा, तालुका पातळीवर वृत्तपत्रांची संख्या वाढल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या माध्यमकर्मींचा एक मोठा घटकच तयार झाला. लोकशाहीचा चौथा खांब म्हणून, समाजातील सर्व घटकांचे प्रश्न राजकीय व्यवस्थेसमोर मांडणाऱ्या आणि सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी झगडणाऱ्या माध्यम क्षेत्रालाही विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते.**



लघु वृत्तपत्र चालकांसह, माध्यमकर्मींना तर अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. पत्रकारांना मिळणारा तुटपुंजा पगार, नाममात्र मानधन यामुळे, बाहेरून असलेले या क्षेत्राचे आकर्षक प्रत्यक्षात काम करताना किती आर्थीक पातळीवर विदारक आहे याची जाणीव होते. त्यामुळे या माध्यम क्षेत्राचे प्रश्न सोडवण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असले पाहिजे, काम करणाऱ्यांना न्याय-सन्मान मिळाला पाहिजे या उद्देशाने दैनिक जनप्रवास आणि सांजमहानगरी वृत्तसमुहाचे संपादक संजय भोकरे हे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई संघटनेच्या स्थापनेपासून कार्यरत आहेत. त्यांनी शहरासह ग्रामीण भागातील पत्रकारांचे संघटन करुन एकीची वज्रमुठच तयार करत, पत्रकारांना स्वताःचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रेरीत केले. पत्रकारांची संघटना ही सक्षम असली पाहिजे यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, सांगली, अहमदनगर येथे विभागीय कार्यालयाची स्थापना करुन राज्यातील बहुतांशी जिल्ह्यांमध्ये संघटनेची स्वतंत्र कार्यालये उभी केली.

राज्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहरात पत्रकारांचे संघटन असणारी आणि माध्यम क्षेत्रातील सर्व घटकाला अडचणीच्या काळात मदत करणारी राज्य पत्रकार संघ एकमेव संघटना झाली. राज्यस्तरावरील दिग्गजांचे सल्लागार मंडळ निर्माण करुन संघटनेची विश्वासार्हता अधिक दृढ केली. संजय भोकरे यांच्या नेतृत्वाखाली ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर, गोविंद घोळवे, राजा माने या राज्य अध्यक्षांनी आपल्या कार्यकाळात संघटनेला सर्वदूर पोहचवून संघटनेचा दबदबा निर्माण केला. संजय भोकरे यांच्या नेतृत्वाने पत्रकारांना स्वतःच्या प्रश्नांची जाणीव करुन देत ते सोडवण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. दरवर्षी संघटनेचे होणारे राज्य अधिवेशने, विभागवार आणि जिल्हा पातळीवरील मेळाव्यातून पत्रकारांच्या प्रश्नांकडे सरकारचे आणि समाजाचे लक्ष वेधले. पत्रकारितेबरोबरच कला, क्रीडा, चित्रपट, साहित्य या क्षेत्रातील मान्यवरांनाही संघाच्या वतीने सन्मानित करुन कृतज्ञता व्यक्त केली जाते. बातमी बरोबरच समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी संघटना आपली क्षमता वापरुन मदत करण्याची भूमिका घेते. तंत्रज्ञानातील वेगाने होत असलेला बदल आणि डिजीटल मिडीयाची गरज लक्षात घेऊन संजय भोकरे यांनी संघटनेच्या विभागीय कार्यालयांमध्ये अद्यावत स्टुडीओची निर्मिती करुन संघटनेला अधिक लोकाभिमुख केले आहे. संघटना अधिक सक्षम आणि विचारांचे सहज अदान प्रदान व्हावे. राज्य आणि जिल्हा, तालुका पातळीपर्यंत सर्वांशी संपर्क रहावा यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पत्रकारांमध्ये विश्वास निर्माण करत पत्रकारांचा आवाज बुलंद केला. तर संघटनेच्या माध्यमातून राज्यभरात क्षमता असलेल्या अनेक पत्रकारांचे नेतृत्व विकसित केल्याने माध्यम क्षेत्रात नेतृत्व घडवणारे वस्ताद ठरले. त्यामुळेच विधिमंडळ पत्रकारांचा प्रतिनिधी असावा यासाठी राज्यपाल नियुक्त विधानपरिषद सदस्यासाठी संबंध राज्यातील पत्रकारांमधुन एकमेव भोकरे यांच्या नावाची मागणी झाली. राज्यपालांनी संजय भोकरे यांना विधान परिषदेवर नियुक्त केले तर पत्रकारांच्या प्रश्नांना न्याय मिळेल असा विश्वास आहे. अशा महाराष्ट्राच्या क्रीडा, पत्रकारीता क्षेत्राला समृध्द करणाऱ्या संजय भोकरे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

# पत्रकारांचे मार्गदर्शक



विश्वासराव आरोटे
राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई.

आधुनिक केसरी

**आदरणीय साहेब,**

**आज तुमचा वाढदिवस. तुम्हाला अत्यंत मन:पूर्वक शुभेच्छा! माझ्या एकट्याच्याच नव्हे, तर तुम्हाला मानणाऱ्या राज्यातील हजारो पत्रकारांच्या शुभेच्छा! तुमची कर्तबगारी तुम्हाला यापुढे अधिक यश मिळवून देईल, असा विश्वास महाराष्ट्रातील पत्रकारांना निश्चितपणे आहे. वाढदिवस हे निमित्त आहे. या दिवशी शुभेच्छांचा वर्षाव होतोच. पण या शुभेच्छा एका दिवसापुरत्या नाहीत, 365 दिवसांकरिता आहेत.**

तुम्ही आम्हा तरुण पत्रकारांचे मार्गदर्शक आहात. एकीकडे तुमच्यासारखे आदर्श नेतृत्व आणि दुसरीकडे तुमच्या कामाच्या झपाट्याने भारावलेले आम्ही सगळे पत्रकार. त्यातूनच एक शक्ती आपोआप निर्माण होत आहे. तुमचे नेतृत्व माझ्यासारख्यांना भावले, याची कारणे अतिशय वेगळी आहेत. अगदी मोकळेपणाने सांगतो. समाजाच्या आणि पत्रकारांच्या प्रश्नांसाठी स्वतःला झोकून दिलेत. अविरत काम करण्याची तुमची धमक हे तुमचे विलक्षण सामर्थ्य आहे. मेहनत आणि जिद्द तुमच्याकडून शिकावी. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघासाठी तुम्ही किती मेहनत घेता हे आम्ही रोज पाहत आहोत. एकीकडे संघटनेची वाढ करताना तुम्ही संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन आणि श्री.अंबाबाई तालिम शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्रांती देखील केली.

राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांचे नेतृत्व तुम्ही करत आहात आणि लवकरच देशातील पत्रकारांचे नेतृत्वही तुम्ही कराल, ही काही आता काल्पनिक गोष्ट राहिलेली नाही. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांना मोठी शक्ती तुम्ही देत आहात. पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठीची तुमची तळमळ तुमच्या प्रत्येक दिवशी आम्हाला जाणवते आहे. तुम्ही स्वतःपुरते कधीच पाहिले नाही. प्रत्येक विषयात आपले पत्रकार बांधव कसे उभे राहतील, त्यांना विविध सुविधा कशा निर्माण होतील याचा विचार तुम्ही करता आणि हेच तुमचे मोठेपण भावले आहे. आज समाजात स्वतःखेरीज दुसर्याचा विचार करणारी माणसे फार कमी आहेत. स्पष्ट बोलणारी आणि निर्भीडपणे मत मांडणारी तुमच्यासारखी माणसे ही समाजाची गरज आहे. तुमच्या स्वभावामध्ये स्पष्टपणाचे एक सुंदर मिश्रण झाले आहे. कोणाला ते आवडेल, कोणाला आवडणार नाही, पण तुमच्या कोणत्याही कामात बघतो, पाहतो हे शब्द तुमच्या कोषात नाहीत. काम करायचे म्हणजे तुम्ही करून टाकता. तुमच्या स्वभावात स्वच्छता, स्पष्टता आणि पारदर्शकता जाणवणारी आहे. तुमच्यापासून माझ्यासारखी लहान माणसे जे काही शिकले, ते हेच शिकले आहे की, काम करताना स्पष्टता ठेवा. महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील पत्रकारांची बांधणी करण्याचे काम आपण करत आहात, त्यामुळे तुमची नाळ महाराष्ट्राशी जोडली गेलेली आहे. हे तुमच्या कामाच्या तडफेमुळे दिसते आहे.



राज्यातील ग्रामीण व शहरी भागात संघटनेत काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला व वृत्तपत्राशी संबंधीत प्रत्येक घटकाला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी, त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकारसंघाने नेहमीच आग्रही भूमिका घेतलेली आहे. याच माध्यमातून संघाने पत्रकार संरक्षण कायद्यासाठी दिलेल्या लढ्याला यश मिळून पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आला. तसेच पत्रकारांसाठी बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजना शासनाने जाहीर केली हे देखील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने केलेल्या पाठपुराव्याला आलेले यश असून यामागे राज्य संघटक म्हणून आपले असणारे मार्गदर्शन आणि प्रेरणा महत्वाची ठरली.

राज्यातील बहुसंख्य वृत्तपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकारसंघाशी जोडले गेले आहेत. राज्यातील कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, नागपूर, पश्चिमम महाराष्ट, गोवा, बेळगाव या भागात संघटनेन सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारुन हा पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणण्याच्या दृष्टीने स्वतंत्र लढा दिला. राज्य मंत्री मंडळातील डझणभर मंत्र्यांकडे या कायद्यासाठी राज्य पत्रकार संघाने पाठपुरावा केला होता. संघटनेने तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार व गृहमंत्री ना. सुशिलकुमार शिंदे, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना निवेदन देऊन हा कायदा राज्य शासनास अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे हा कायदा अंमलात येणे शक्य झाले. आपल्याच पुढाकारातून सांगली, सोलापूर, कोहापूर, पुणे, मुंबई, औरंगाबाद या ठिकाणी पत्रकार भवन उभारण्यात आले आहे. याबरोबरच देशाच्या राजधानीतही पत्रकार भवन उभारले आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही या सवलती मिळाव्यात अशी आपली भूमिका आहे. ग्रामीण भागासह वर्तमानपत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व लढ्यासाठी संघाने व आपण स्वतः नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे.

बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या निमित्ताने या लढ्याला काहीसे यश मिळाले आहे. मात्र इतरही लाभ पत्रकारांना मिळवून देण्याचा संघटनेचा आणि आपला प्रयत्न आहे. संघाच्या वतीने दरवर्षी घेतल्या जाणार्‍या राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकारांच्या विविध मागण्यांसंदर्भात चर्चा करुन मागण्यांचे ठराव शासनाकडे पाठवून त्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा केला जातो. राज्यातील पूर परिस्थिती आणि गत दोन वर्षापासून सुरु असलेली कोरोना महामारी यातही आपण आणि संघाने मदतीचा हात पुढे केला. होईल ती मदत राज्यातील पत्रकारांनी पुरविली.

पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार यांना एक लाख रुपये रोख स्वरुप असलेला जीवनगौरव पुरस्कार आपल्याच कल्पनेतून सुरु झाला आणि अनेक मान्यवरांना आपण संघाच्या माध्यमातून सन्मानित केले.आपल्या संकल्पनेतून पत्रकार संघाने नाविण्यपूर्ण उपक्रम राबवत राज्यभरातील पत्रकारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोफत हेल्मेट वाटप केले. आपले कार्य हे पत्रकार संघापुरते मर्यादीत नसून आपल्या सांगली येथील श्रीअंबाबाई तालीम संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तसेच क्रीडा क्षेत्रातही आपण शासनाचा छत्रपती क्रीडा पुरस्कार मिळविला आहे. आपले हे कार्य असेच यापुढे अविरत सुरु रहावे, हीच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा!



# वेळेला आणि काळाला थांबवते ते म्हणजे छायाचित्र : प्रतीक बोपचे

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** फोटोग्राफी ही एक कला आहे. फोटोग्राफरला ती दृष्टी पाहीजे त्याशिवाय छायाचित्र जिवंत भासत नाही. वेळेला व काळाला थांबविते ते म्हणजे छायाचित्र होय असे प्रतिपादन प्रतिक बोपचे यांनी जागतिक फोटोग्राफी दिनाच्या रोजीच्या कार्यक्रमात केले. पुसद फोटोग्राफर संघटनेची कार्यकारिणी निवड व तसेच ज्येष्ठ फोटोग्राफर यांचा सत्कारसमारंभ करण्यात आला. व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून सुरज डुब्बेवार व तसेच प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब पुसद चे सचिव स्वप्नील चिंतामणी व ज्येष्ठ फोटोग्राफर राजाभाऊ सोनटक्के व तसेच दिलीप अर्धापूरकर हे उपस्थित होते.

संघटन ही काळाची गरज हा मंत्र समोर घेऊन पुसद फोटोग्राफर असोसिएशनची निर्मिती करण्यात आलेली आहे तसेच ही संघटना पुसदमधील फोटोग्राफर बांधवांसाठी सदैव तत्पर असेल शहरातील फोटोग्राफर बंधूंच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच सदैव त्यांच्या पाठीशी मजबुतीने उअसण्यासाठी व त्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी या संघटनेची निर्मिती करण्यात आली असून या संघटनेपासून सदैव फोटोग्राफर बंधूंचे हित जोपासले जाईल असे प्रास्ताविकामध्ये प्रतीक बोपचे यांनी आपले मत व्यक्त केले.






प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभलेल्या स्वप्नील चिंतामणी यांनी सर्व फोटोग्राफर बंधूंना नवीन तंत्रज्ञानासंदर्भात मार्गदर्शन केले. सर्व फोटोग्राफरच्या समस्या थोडक्यात मांडून त्यांना भविष्यात वाटचालीसाठी कश्याप्रकारे मार्ग सुलभ व सोयीस्कर जाईल यासाठी व तसेच फोटोग्राफर बांधवाचे उत्पन्नाचे मार्ग कशा प्रकारे वाढतील याबद्दल सर्व फोटोग्राफर बंधू यांच्याकडून आपले मत कुणाल भावसार यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये सूरज डुबेवार यांनी संघटनेचे महत्त्व व संघटना भविष्यामध्ये अजून कार्यक्षम कशी बनेल यासाठी सर्वांना मार्गदर्शन केले व तसेच पुसद चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांच्याकडून पुसद फोटोग्राफर असोसिएशनला वेळोवेळी सहकार्य वमार्गदर्शन मिळेल या संदर्भात आश्वासन दिले. हजारो शब्द जिथे अपुरे पडतात त्याठिकाणी एक छायाचित्र बोलके ठरते फोटोग्राफी हि कला असून आपण सर्वजण उत्कृष्ट प्रकारे ती कला जोपासली आहे या कलेचा आपल्याला व्यवसायात कशा प्रकारे फायदा होईल व त्यामुळे आपले कुटुंब आर्थिक उन्नत कसे होईल या संदर्भातदेखील मार्गदर्शन केले.

पुसद फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्ष उपाध्यक्ष व सचिव या पदांच्या निवडीकरिता व तसेच तक्रार निवारण समितीचे प्रमुख निवडीकरिता एकाचवेळी मतदान घेण्यात आले. सर्व फोटोग्राफर बंधूंनी शांत व संयमाने आपला परिचय देत मतदान केले पारदर्शक मतदान पध्दतीने मतदान केल्याने अध्यक्ष उपाध्यक्ष व सचिव तसेच तक्रार निवारण समितीचे प्रमुख निवडण्याकरिता आयोजकाला हे सर्व सोयीस्कर गेले.

पुसद फोटोग्राफर असोसिएशनच्या अध्यक्षपदी आशिष कोटुरवार यांची निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्षपदी सचिनमहाजन यांची निवड करण्यात आली व सचिवपदी अनिल गावंडे यांची निवड करण्यात आली व कोषाध्यक्ष पदाची निवड करण्याकरिता सर्वानुमते बिनविरोध शुभम चिद्दरवार यांची निवड करण्यात आली.

तक्रार समितीचे प्रमुख म्हणून संतोष मस्के व सचिन सोनटक्के गौरव अर्धापूरकर, शैलेश कोटुरवार, नितीन दाभाडकर, प्रसिद्धी प्रमुखपदी प्रतीक बोपचे, व्यवस्थापन समिती प्रमुखपदी कुणाल भावसार तर समिती सदस्य म्हणून राजू चिरडे, भगवान आबाळे, गजानन मुटकुळे, रौनक राठोड, दीपक अग्रवाल, गिरीष डहाळे, सचिन ढोणे, सल्लागार म्हणून विनोद जोशी व संजय बोपचे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शुभम चिदृरवार यांनी केले.




## डॉ.सौ.इं.भा.पाठक महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डॉ.सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे शासकीय निरीक्षण गृह, औरंगाबाद (रिमांड होम) येथील विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन दिन दि.२२/०२/२०२२ रोजी उत्साहात साजरा केला. हा उपक्रम समाजशास्त्र विभागातर्फे गेल्या १७ वर्षापासून सातत्याने राबविला जात आहे. आपल्या समाजात एक असाही गट आहे जो वंचित, उपेक्षित व परावलंबी आहे. ज्यांच्याबद्दल आपल्या विद्यार्थीनीमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी व रक्षाबंधनाचे महत्व कळावे या उद्देशाने ही शैक्षणिक भेट दरवर्षी देण्यात येते. त्याचप्रमाणे याहीवर्षी बी.ए. समाजशास्त्र विभागातर्फे विद्यार्थीनीनी मुलांना राख्या बांधल्या व त्यांना गोडधोडखाऊ घातले. तसेच यावर्षी समाजशास्त्र विभागातर्फे त्यांना पेन व पेन्सिल यांचे वाटप करण्यात आले. यावेळी निरीक्षक गृहाचे अधीक्षक सूर्यभान जंगले यांनी विद्यार्थीनीना शुभेच्छा दिल्या तर काळजीवाहक जगदीश बिरसोने यांनी विद्यार्थीनीना निरीक्षण गृहाविषयी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीनी रिमांड होमच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित यांनी विद्यार्थीनीना व विभागातील प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी आघाव, प्रास्ताविक प्रा. लंका राजपूत तर आभार प्रा. सरिता डोंगरजाळ यांनी केले.

## परभणीतील वाहतूक कोंडीवर आमदार डॉ.राहुल पाटील यांनी उपस्थित केला प्रश्न

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** शहरातील वाहतूक कोंडीवर परभणीचे शिवसेना आमदार डॉ.राहुल पाटील यांनी विधानसभा अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला असून त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले आहे. परभणी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीबाबत आमदार डॉ.राहुल पाटील यांनी पावसाळी अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला आहे. परभणी शहराच्या रस्त्यावर अतिक्रमणे झाली आहेत. झेब्रा क्रॉसिंग व सिग्नल व्यवस्था बंद अवस्थेत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे तसेच महापालिकेच्या दुर्लक्षामुळे मुख्य चौकातील सिग्नल व्यवस्था सहा वर्षापासून बंद आहे. सिग्नल व्यवस्था सुरू करण्यासंदर्भात पोलीस प्रशासनाने महापालिका प्रशासनाकडे वारंवार लिखित पत्र व्यवहार करूनही महापालिकेकडून कोणतेही कारवाई करण्यात आली नाही तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्याच्या अनुषंगाने व सदर प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिका प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली, असा प्रश्न आमदार डॉ. पाटील यांनी विधानसभेत उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले ते म्हणाले, शहरात वाहतूक कोंडी होत आहे हे खरे आहे. मुख्य चौकातील रस्त्यावर राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत महामार्ग 61 चे रुंदीकरण करण्याचे काम चालू असून सिग्नल व्यवस्थेचे केबल तुटल्यामुळे सिग्नल व्यवस्था बंद असल्याचे सांगितले. वाहतुकीस अडथळा होत असलेल्या शहरातील बाजारपेठ, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 61 कडेला झालेली अतिक्रमणे काढून टाकण्याची कारवाई सुरू असून सिग्नल व्यवस्था अद्यावत करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे, असे देखील मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## गल्ले बोरगाव येथे संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील गल्ले बोरगाव येथे संत सेना महाराज यांचे पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. मंगळवार दि.२३ ऑगस्ट रोजी संत सेना यांच्या पुण्यतिथीनिमित्त विठ्ठल मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी प्रथम संत सेना महाराजांच्या प्रतिमेची पूजन ह.भ.प. बाळकृष्ण महाराज यांच्या हस्ते करण्यात आले व महाआरती करण्यात आली. रात्री चक्री भजनाचा कार्यक्रम झाला.

तदनंतर समाजबांधवांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामदास पंडीत, तुळशीराम शेळके, राजेंद्र बढे पाटील, ज्ञानेश्वर भगत, कपूरचंद राजपूत, ताराचंद राजपूत, हरिभाऊ पंडीत, श्रीपतराव बढे, सुखदेव पंडीत, देविदास पंडीत, अंकुश गायकवाड, गोपीनाथ तोडकर, मधुकर पंडीत, गणेश पंडीत, ऋषिकेश तोडकर, नारायण पंडीत, राहुल पंडीत, संतोष शेळके, योगेश पंडीत, शुभम पंडीत, गोटू शेळके, लहू गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## मोकाट श्वानांमुळे नागरिकांचा जीव गेल्यास मनपावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार : नगरसेवक किरण आहिरराव

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सध्या शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात मोकाट श्वानांची संख्या वाढत आहे. या मोकाट श्वानांचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये शहरातील दोन नागरिकांचा या मोकाट श्वानांनी घेतलेल्या चाव्यामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यापुढे मोकाट श्वानांच्या चाव्यामुळे नागरिकांचा जीव गेल्यास मनपावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा नगरसेवक किरण अहिरराव यांनी दिला आहे.

या प्रकरणात मनपाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी तक्रारी करून तसेच स्थायी सह महासभेत विषय मांडून देखील या मोकाट श्वानांची निर्बीजीकरण करण्याचा ठेक्याचा एवढा उशीर का होतोय? नागरिकांचे जीव जाऊन देखील कुंभकरणी झोपेत गेलेले महापालिका प्रशासन आता तरी जागे होणार का? असा संतप्त सवाल नगरसेवक किरण अहिरराव यांनी आज झालेल्या स्थायी च्या सभेत मनपा प्रशासनाला विचारला आहे. यापुढे मोकाट श्वानांच्या चाव्यामुळे नागरिकांचा जीव गेल्यास मनपा प्रशासनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा नगरसेवक अहिरराव यांनी मनपा प्रशासनाला दिला आहे.

## स्व.मेटे यांच्या दशक्रियाविधीनिमित्त हजारोंनी वाहिली श्रद्धांजली

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** मराठा आरक्षण संघर्ष योद्धा स्वर्गीय आमदार विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले होते. दि. 23 रोजी सकाळी पैठण येथील दक्षिण भूमी मोक्षघाटावर दशक्रिया विधी पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वर्गीय विनायक मेटे यांना आदरांजली वाहिली. आमदार विनायक मेटे यांच्या वाहनाला 14 ऑगस्ट रोजी मुंबई एक्सप्रेस हायवे वर अपघात झाला. अपघातात विनायक मेटे यांचे निधन झाले. आज सकाळी नऊ वाजता दक्षिण भूमी असलेल्या पैठण मोक्ष घाटावर यांचे पुत्र आशुतोष मेटे, मुलगी आकांक्षा, पत्नी ज्योतीताई, भाऊ रामहरी, मेहुणे झारखंडचे डीआयजी नितीन लाटकर यांचे उपस्थित



दशक्रिया विधी पार पडला. यावेळी पुरोहित गर्गे देवा यांच्या मंत्रघोषात दशक्रिया विधीचे पूजन झाले. यावेळी माजी आ. धांडे, काकासाहेब देशमुख, उत्तम वाकडे, मुरली पोकळे, कृष्णा कुमावत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वर्गीय विनायक मेटे यांना आदरांजली वाहिली.

## अंजोळा येथे कापूस उत्पादता वाढ मूल्य साखळी विकास योजने अंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील अंजोळा येथे दि.२३ रोजी सोयगाव कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. राज्य पुरस्कृत कापूस उत्पादकता वाढ मूल्य साखळी विकास योजनेअंतर्गत तालुका कृषी अधिकारी सोयगाव व मंडळ कृषी अधिकारी बनोटी यांच्या मार्गदर्शनाखाली शेती शाळा वर्ग घेण्यात आला.

शेती शाळेत मागील शेती शाळा वर्गातील मागोवा घेऊन सद्यस्थितीत असलेल्या रोग व किडी कामगंध सापडे लावून सेंद्रिय बोंड अळी नियंत्रण याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. फवारणी करताना घ्यावयाची काळजी व फवारणी किट चा वापर कसा करावा याची देखील माहिती देण्यात आली. योजनेअंतर्गत आलेल्या निविष्ठा व कामगंध सापळे वाटप करण्यात आले व




कापूस पिकांवर प्रादुर्भाव जास्तच वाढल्याने फवारणी कशी करावी, अशी फवारणीबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमाच्या वेळी गावातील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बामसेफचे राज्यअधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** बामसेफ या सामाजिक संघटनेचे दोन दिवसीय अधिवेशन जळगाव खान्देश येथे दि.२७ व २८ ऑगस्ट २०२२ रोजी होऊ घातले आहे. तेथे फुले-आंबेडकरवादी समाजाने तथा परिवर्तनावर विश्वास असणाऱ्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भिमराव परघरमोल (अकोला जिल्हा महासचिव, बामसेफ) यांनी केले आहे. सविस्तर वृत्त असे की, बामसेफ या सामाजिक संघटनेचे राज्य अधिवेशन ला.ना. विद्यालय कै.भैय्यासाहेब गंधे सभागृह SBI मुख्य शाखेसमोर प्रताप नगर छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम जवळ, जळगाव महाराष्ट्र येथे दोन दिवस भरणार आहे. त्यामध्ये प्रबोधनाच्या तीन सत्रांसह उद्घाटन व समारोपीय सत्रांचा समावेश असणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. प्रदीप आगलावे (सचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती महाराष्ट्र शासन तथा प्रसिद्ध लेखक) हे उपस्थित राहणार आहेत. प्रबोधन सत्रांमध्येमध्ये प्रासंगिक विषय घेण्यात आले असून त्यामध्ये जाती आधारित जनगणना, सविधान जागृतीसाठी BS4 अभियान, धर्माधारित देशाचा आग्रह-एक राष्ट्रघातकी पाऊल, खाजगीकरण व कंत्राटी पद्धत नष्ट करण्याची रणनीती-एक राष्ट्रीय चर्चा. अशा विविध विषयांवर भारतातील विद्वान तथा तज्ञ लोक आपले विचार व्यक्त करणार आहेत.

# सर्जा-राजाच्या साजाने बाजारपेठ सजली

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शेतीत वर्षभर राबणाऱ्या बैलाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बळीराजा पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. यंदा पोळा शनिवारी आहे. त्यामुळे सावळदबारा व देवळगांव (गुजरी) येथे बाजारात सर्जा राजासाठी लागणारे विविध साहित्य खरेदीसाठी आले आहे.

पुढचा मंगळवार बाजार हाती लागणार नसल्यामुळे बाजारात शेतकरी बांधव पोळा सणाकरीता लागणारे साहित्य खरेदी करताना व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांसाठी पोळा हा सण खूप महत्त्वाचा आहे कारण शेतकरीच्या बैलाच्या भरोशावर काळ्या मातीत सेवा करतो. त्यामुळे त्याच्या घरात अन्नधान्य येते. त्यांनी येथे बैलाची कृतज्ञ व्यक्त करण्याबाबत पोळ्याच्या आदल्या दिवशी खादेमळणी केली जाते. दुसऱ्या दिवशी पोळा हा सण मोठ्या उत्साहाने पार पडतो. पोळा या सणासाठी शेतकरी बंधू पैशाची जुळवाजुळव करून आवश्यक त्या साहित्याची खरेदी



करताना जिल्ह्यात पावसाचे प्रमाण थोडे फार चांगले असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील पिकेही थोड्याफार प्रमाणात चांगली असल्याने बळीराजा पोळा सणाकरीता लागणारे साहित्य खरेदी सढळ हाताने करीत असल्याचे दिसून येत आहे.

दरवर्षीच्या तुलनेत बैलाच्या साजाच्या किंमतीत दहा ते पंधरा टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र लाडक्या सर्जा राजासमोर ही वाढ जास्त वाटत नसल्याचे दिसून येत आहे.

### गोधन घटली

**गेल्या काही वर्षात ग्रामीण भागातील चराई क्षेत्रात झपाट्याने घट झाली. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या बांधावरील गोधनावर परिणाम झाला. गोधनाची संख्या घटल्याने चांगल्या प्रतीची बैल देखील शेतकऱ्यांकडे राहिले नाही त्यातच बरेच शेतकरी आता तांत्रिक पद्धतीने ट्रक्टरद्वारे शेती करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या गोठ्यात बैल उरले नाही.**

**राज रामराज ठाकूर**
**शेतकरी, देवळगाव गुजरी ता. जामनेर**



# देवगाव रंगारी सर्कलमधील पळसखेडा येथे बुथ सक्षमीकरण अभियान बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील पळसखेडा येथे दि. 24 ऑगस्ट 2022 रोजी बूथ सक्षमीकरण बैठक संपन्न झाली. बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित भाजपा जिल्हा सचिव प्रा. डॉ. संजय गव्हाणे, किसान मोर्चा ता. उपाध्यक्ष माधव भोजने, बूथ अध्यक्ष बापू पवार, जीवन घुनावत, शेखर चांदवडे, अमोल पवार, अमोल काकडे, सुदाम सोनवणे, आकाश पवार, उमेश कवडे, राजेंद्र काकडे, रावसाहेब सोनवणे, गोरख काकडे, हरिभाऊ काकडे, गणेश काकडे, समाधान सोनवणे, गौतम सोनवणे व सर्व गावकरी पदाधिकारी उपस्थित होते.

# उत्सवाला गालबोट लावणाऱ्यांची गय केली जाणार नाही : डॉ. पवन बनसोड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे पोळा व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर औरंगाबाद ग्रामीणचे अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. पवन बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली कन्नड येथे तालुकास्तरीय शांतता समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी मुकुंद आघाव उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड, मुख्यअधिकारी नंदकिशोर भोंबे, कन्नड पोलीस स्टेशनचे निरीक्षक राजीव तळेकर, भुजंग हातमोडे, तात्याराव भालेराव, कोमल शिंदे, दिनेश जाधव, भुषण सोनार, महावितरणचे संतोष कोल्हे, श्रावण तायडे, गणपती महासंघाचे अध्यक्ष संदेश पवार, केतन काजे यांची प्रमुख उपस्थीती होती.

यावेळी गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता डॉ. पवन बनसोड (अप्पर पोलीस अधीक्षक) यांनी मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी गणेश मंडपामुळे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेणे, जबरदस्तीने कोणाकडूनही वर्गणी मागू नये, गणेश मंडळाचे ठिकाणी दाखविण्यात येणारे देखावे हे आक्षेपार्ह अगर सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, अशा प्रकारचे ठेवावे, गणेश मंडळाचे ठिकाणी स्वयंसेवक सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बाबत सूचना देण्यात आल्या. न.प.च्या वतीने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजून घ्या, या काळात लाईट जाणार नाही याची महावितरणने काळजी घ्यावी, तसेच मंडळाच्या ठिकाणी जुगार खेळु नये, दारू पिवु नये, डिजे बंद ठेवा, पारंपारीक वाद्यांना प्राधान्य द्यावा, गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी यांना सर्व विभागाच्या परवानगी घेणे बंधनकारक राहील. अशा विविध मार्गदर्शक सुचना डॉ. पवन बनसोडे यांच्याकडुन करण्यात आल्या.

यावेळी सुत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके यांनी केले. यावेळी डॉ. सदाशिव पाटील, सुरेश डोळस, भैया मेंबर, राजू मोकासे, पांडुरंग घुगे, सिद्धार्थ निकाळजे, मनोज देशमुख, अशोक वाहूळ, अनिल खंबाट, संतोष पवार व तालुक्यातील गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व तालुक्यातील सरपंच, पोलीस पाटील व गणेश भक्त हजर होते.






# सावळदबारा येथे महारक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे आज दि.23 ऑगस्ट 2022 रोजी कै.लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा व राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने जय कालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा अध्यक्ष भाऊराव लक्ष्मणराव कोलते व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील व परिसरातील अनेक आजी-माजी विद्यार्थ्यांनी आज सहभाग नोंदविला. प्रत्येक रक्तदात्यांनी रक्तदान देताना सर्वप्रथम या अमृत महोत्सव निमित्त हे रक्तदान शिबिर देशासाठी अर्पण करावे, ही सदभावना व्यक्त केली. त्यामुळे या रक्तदान शिबिराचे चीज झाले असे संस्था अध्यक्ष यांनी आपले मत व्यक्त केले. या रक्तदान शिबिरासाठी बुलढाणा येथील जीवन धरा बुलढाणा अर्बन ब्लड बँक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.डाळे, डॉ. महेश बक्कड, डॉ. अनिल जाधव, डॉ. मोनाली उबाळे व डॉ. पूजा झगडे व मदतनीस गणेश शेळके या अधिकारी यांनी या शिबिरासाठी खूप मेहनत घेतली व प्रत्येक रक्तदात्याची विचारपूस करून त्याला व्यवस्थित उपचारापद्धती दिली. हे रक्तदान शिबिर संपन्न करण्यासाठी शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य नारायण कोलते, प्र.प्राचार्य योगेश थोटे, प्रा.पंजाबराव शेळके, किशोर चोपडे, जयराम घोती, दीपक सपाटे, अंकुश कोलते, अजय रबडे, विनोद चव्हाण, दिलीप शिसोडे, सतीश गावंडे, अजबराव चव्हाण, गजानन चव्हाण, अमोल गवळी यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळेस गावातील व परिसरातील अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी सुद्धा रक्तदान शिबिरात आपला सहभाग नोंदविला. मो.तालीब, संजय देशमुख, विनोद इंगळे, मनोज बुढाळ, एकनाथ गवई, अमोल सवकर, शुभम मोरे, श्रीकांत पुजारी, चेतन जमाले, योगेश सोळुंखे, कृष्णा मकोडे, प्रदीप चव्हाण, पियुष कोते, अक्षय कोते, गणेश अंगायते, सागर कुल्ली, आकाश गायकवाड, शत्रूघन धोंडे, शेखर कुल्ले, मो. सोहिल मो.अफसर, विशाल खडके, शे. फारुख शे. आयुब, शे. सलमान शे. समीर, आकाश जाधव, मुयुर महाजन, योगश टिकरे, सुनील महाजन, जीवन देशपांडे, भाकरे व इतर मित्र मंडळ सावळदबारा पोलीस पाटील विलास कुल्ली, भागवत गायकवाड, माजी सैनिक जाधव, वायरमन ज्ञानेश्वर घोडके, शाळा कर्मचारी राहुल बडक, गजानन चव्हाण, संदीप कोलते, जीवन कोलते आदी उपस्थित होते.

यावेळेस पत्रकार बंधू रहीम पठाण, गोकुळसिंग राजपूत, जब्बार तडवी व इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वांचे आभार प्रा.नारायण कोलते यांनी मानले.

# आधुनिकतेची कास धरलेल्या समाजाला पोळा सणाचा पडतोय विसर?

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर नीळ**

**कचनेर :** आधुनिकतेची कास धरलेला समाज व शेतीचे होत असलेले यांत्रिकीकरण याचा सरळ फटका सर्जा राजाला बसताना दिसतो. दिवसेंदिवस शेती क्षेत्रात होणारे घट. सततचे दुष्काळी चटके आणि बैलाच्या गगनाला भिडलेल्या किमती. शिवाय शेती डबघाईला जात असल्याने शेतकऱ्याचे अर्थकारण बिघडत चालले आहे. या कारणास्तव बैलाची संख्या घटत चालली आहे. शेतकऱ्याकडे बैल जोडी आता दुर्मिळ होत चालली आहे.

पूर्वी पोळा सण हा शेतकऱ्यांचा आवडता सण होता. कारण वर्षभर ते त्या शेतात राब-राब राबणाऱ्या बळीराजाला कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण होता. पूर्वी पोळ्या सणाला मोठे वैभव होते पण आता मात्र चित्र बदललेले दिसते. पोळ्याच्या दिवशी भरगच्च भरणारे मैदान आता रिकामे दिसत आहे. कृषीप्रधान देशासाठी ही बाब चितेची ठेवू शकते. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आधारित आहे. शेती ही भूषण वाटणारे तसेच गावाता रुबाब दाखवणारा व्यवसाय होता. ज्याच्याकडे जास्त शेती सोबत जास्त जनावरे



असली की. त्याला आपोआप मोठेपणाचे वलय प्राप्त व्हायचे, जास्तीत जास्त शेतीची चर्चा गावोगाव घडायची एक प्रकारे तो गावचा जमीनदार म्हणून परिचित असायचा. शेतकऱ्यांना शेती हा व्यवसाय साधा सरळ व पदरात दोन पैसे पडणारे म्हणून भरोशाचा वाटत होते. ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या दाराशी पूर्वी दुभती जनावरे व बैलजोडी विकास असायची. जास्त मोठा शेतकरी असला की त्याच्याकडे जास्त बैलजोडी असायच्या. त्यामुळे मोठ्यामध्ये वैभव असायचे. परंतु काळाच्या ओघांमध्ये बळीराजाच्या गोठ्याचे वैभव हळूहळू कमी होत चालले. शेती आधुनिक यंत्राद्वारे करण्यात येऊ लागली. बैलाच्या किंमती गगनाला भिडल्या व शेतीच्या वाटण्या होत असल्यामुळे शेतीचे प्रमाण सुद्धा कमी होऊ लागले.

त्यामुळे अल्प व मध्यम प्रकल्प गटातील शेतकऱ्यांना बैल पाळणे अशक्य झाले आहे. अल्पभूधारक शेतकऱ्याकडे जनावरे दिसत असली तरी ती फक्त दूध व्यवसायासाठी असतात. मोठ्यात बैलजोडी ऐवजी गाई म्हशी दिसून येतात. पूर्वी गोठ्यातील बैलाच्या संख्येतून याची समृद्धी मोजली जात होती. मात्र बदलत्या आधुनिक युगात ट्रॅक्टर मळणी यंत्र, जेसीबी, हारवेस्टर आदी यांत्रिकीकरणाचा उदय होऊन त्यांचा शेतीत झपाट्याने शिरकाव होऊन प्रयोगात आल्याने बैलाची संख्या पटाने कमी होऊ लागली. लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने शेतीच्या वाटण्या होऊ लागल्या. पूर्वी शेकडो जमीन होती पण आता ती तुटपुजी झाली आहे. बहुतांशी शेतकऱ्यांकडे बैलजोडी ठेवण्यात पण जमीन राहिली नसून पर्यायाने त्यांचा कल मोठ्या शेतकऱ्याच्या मदतीने किंवा यंत्राच्या साह्याने शेती मशागत करण्याकडे वाढला आहे. या सर्व कारणामुळे बैलजोडी शेतीतून हद्दपार होताना दिसत आहे.

पोळा हा सण काही दिवसांवर येऊन ठेपला असताना सुद्धा शेतकऱ्यांमध्ये कुठल्याही प्रकारची लगबग दिसून येत नाही. पूर्वी पोळा महिनाभर लांब असताना सुद्धा सणाची मोठी तयारी सुरू व्हायची, बैलाची सजावट करणे, सूत कापणे अशा प्रकारच्या तयारीला सुरुवात व्हायची. बैलाच्या सजावटीसाठी लागणाऱ्या मोरक्या, शिंगदोऱ्या, गोंडे, बैलाच्या अंगावर पांघरणाऱ्या झुली अशा प्रकारचे साहित्य खरेदीकडे शेतकऱ्याचा मोठा कल असायचा. आता रेडीमेड साहित्य खरेदी करतात पण आता पहिल्यासारखे मजा नाही. शेतकऱ्यांना सर्जा राजा डोईजड झाल्यासारखा वाटतो. बैल हा प्राणी कष्टाचा प्रतीक म्हणून बघितला जातो. त्याच बैलाला पूर्वीचे वैभव मिळो. इडा पिडा टळु दे बैलाचे राज्य येऊ दे. म्हणजे कष्ट करायचे राज्य येऊ दे. बैलाला पूर्वीचे वैभव मिळू दे. हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

# पिशोर येथील सोसायटीच्या चेअरमनपदी प्रताप जाधव तर व्हा.चेअरमनपदी संजय जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील अतिशय प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या पिशोर विकास सोसायटीच्या चेअमनपदी बाळासाहेब जाधव मित्रमंडळाच्या शिव सिध्देश्वर पॅनलचे प्रताप विष्णू जाधव तर व्हा.चेअरमपदी संजय शहाजी जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली.

कन्नड तालुक्यातील पिशोर विकास सोसायटीच्या निवडणुकीत विकास महर्षी रायभान जाधव विकास आघाडीचे एक पॅनल तर माजी चेअरमन नारायण जाधव यांचे एक पॅनल व उपसरपंच बाळासाहेब जाधव यांचे शिव सिध्देश्वर पॅनल उभे होते. अतिशय चुरशीच्या निवडूकीत उपसरपंच बाळासाहेब जाधव यांच्या शिव सिध्देश्वर पॅनलने प्रचंड मुसंडी मारत सर्वच्या सर्व तेरा जागा वर 135 मताच्या फरकाने विजय संपादन करत सोसायटीत आपले वर्चस्व सिद्ध केले. या सोसायटीत पिशोर, वाघुळखेडा, मोहाडी, दिगर, शफेपुर, मोहद्री आदी गावातील शेतकरी सभासद आहे. उपसरपंच बाळासाहेब जाधव मित्रमंडळाच्या सर्वच सदस्यांनी अतिशय मेहनत घेऊन, दोन्ही पॅनलला धूळ चारत प्रचंड मोठा विजय प्राप्त केला. त्यात विजयी उमेदवार कृष्णा पुंडलिक जाधव, अशोक रामराव जाधव, सखाराम नारायण जाधव, सुदर्शन पंढरीनाथ चोंधे, तेजराव नामदेव निकम, आरबाज एजाज पठाण, रवींद्र दिलीप नवले, विठ्ठल फकिरराव ढगे, उत्तम रंभाजी वाघ, लताबाई राजेंद्र जाधव, पंचफुलाबाई सुदाम जाधव हे विजयी उमेदवार असून, वरील सर्व संचालकांनी चेअरमनपदी प्रताप जाधव व व्हा. चेअमनपदी संजय जाधव यांची एकमातने निवड केली. सर्व संचालक, चेअरमन, व्हा.चेअरमन व उपसरपंच बाळासाहेब जाधव मित्रमंडळच्या सर्व सदस्यांचे ना.अब्दुल सत्तार कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य, जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, माजी जि.प सदस्या संजना जाधव यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# व्हॉइस ऑफ मीडियाच्या तालुका अध्यक्षपदी गुलाबराव इंगळे

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा. :** तमाम पत्रकारांचा बुलंद आवाज म्हणून प्रसिद्ध असलेली आणि पत्रकार आणि पत्रकारितेच्या उत्कर्षासाठी देशातील अग्रगण्य अशा ५० संपादकांनी एकत्र येऊन "व्हाईस ऑफ मीडिया" ही संघटना स्थापन केली. देशातील सतरा राज्यांमध्ये ही संघटना कार्यरत असून संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांचेसह विदर्भ अध्यक्ष अनिल मस्के यांच्या सूचनेनुसार बुलढाणा जिल्हा अध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे, कार्याध्यक्ष अरुण जैन, लक्ष्मीकांत बगाडे यांनी व्हॉइस ऑफ मीडियाच्या जळगाव (जामोद) तालुका अध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार दैनिक सकाळचे तालुका प्रतिनिधी गुलाबराव इंगळे यांची निवड केली आहे.

जिल्ह्यातील पत्रकारांनी संपूर्ण जिल्ह्यात ही संघटना कार्यरत असून तेरा ही तालुक्यामध्ये संघटनेचे तालुकाध्यक्ष जाहीर झाले असून त्यांच्या माध्यमातून लवकरच ११ सदस्यशीय तालुका कार्यकारणी सुद्धा गठीत होणार आहे. व्हॉइस ऑफ मीडियाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पत्रकारांचे संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे यांनी व्यक्त केला आहे.

# फत्तेपूर बाजारपेठ सजली बैलपोळ्याच्या साजाने

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** शेतकऱ्यांचा बैलपोळा हा सण उद्या वर येऊन ठेपला आहे. त्या निमित्ताने सर्व शेतकरी बांधव अगदी आनंदात व उत्साहात बैलपोळ्याच्या स्वागतासाठी सज्ज आहेत. वर्षभर राब राबणाऱ्या आपल्या बैलसाथीदाराला पोळ्याच्या दिवशी योग्य प्रकारे मानसन्मान दिला जातो. बैलपोळा सणाच्या आदल्या दिवशी आपल्या खांद्यावर शेतकरी मालकांच्या संसाराचा काही प्रमाणात आयुष्यभर ओझं घेऊन चालणाऱ्या खांद्याची मळण नदीतील मानाच्या मूळाने व पळसाच्या पाच पाणी डगळ्यांनी करून पूजा केली जाते. दोन-तीन दिवस त्यांना आराम देण्यात येतो.

पोळ्याच्या दिवशी सकाळीच चांगल्या प्रकारचा चारा देऊन नदी, विहीर किंवा तलावावर नेऊन बैलांना स्वच्छ आंघोळ घालण्यात येते त्यानंतर बैलांना सजविण्यात येते. त्याच्यासाठी वेगवेगळी सजवण्यासाठी साहित्य शेतकरी खरेदी करत असतात. त्यानिमित्ताने फत्तेपूर बाजारात दुकाने थाटले आहेत. आपल्या लाडक्या बैलांना सजवण्यासाठी सामान घेतांनाची शेतकऱ्यांची लगबग दिसत आहे. आपल्या लेकराप्रमाणे मुक्या प्राण्यांना बैलांना जीव लावणारा शेतकरी आज कोणत्याही आर्थिक परिस्थितीत बैलांना सजवण्यासाठी सामान घेण्यासाठी तयार असतो. त्यामध्ये व्यसन, मोरख्या कासरा, हिंगोळ, पाठीवरील झुला, घुंगरमाळा, पायातील पैंजण, कवड्यांच्या माळा, बाशिंग, वेगवेगळ्या रंगाचे गोंडे, रंगीबेरंगी फुगे, वेगवेगळे रंग याचा समावेश असतो. बैलांना सजवून गावामधून ढोल ताशांच्या वाद्यांमध्ये मिरवणूक काढले जाते. मानाच्या बैलाची मानाच्या लोकांकडून विधिवत पूजा केली जाते व आंब्याच्या पानाच्या बांधलेल्या तोरणा खालून बैलांना काढून मारुतीच्या मंदिराकडे जाऊन तेथे नारळ फोडण्यात येते. त्यानंतर घरोघरी बैलांना मिरवून बैलांचीक महिला पाय धुवून त्यांना गोड पदार्थ खायला देऊन व पूजा करतात. घरामध्येही कुंभारांनी बनवलेली मातीच्या बैलांची पूजा केली जाते. घराच्या दरवाजा जवळ व गोट्याजवळ उकीरड्यावर मेढ्या ठेवला जातो. जे लोक आपल्या मालकांची बैलपोळ्यामध्ये धरतात त्यांना पोळ्याच्या दिवशी बैल मालकांच्या घरी पुरणपोळीचे जेवण असते. पोळ्याच्या सणानिमित्त आपल्या घरघड्याला नवीन कपडे शिवतात. हा सारा सोहळा फक्त ग्रामीण भागामध्येच अगदी आनंदात आणि उत्साहात पाहायला मिळतो. बदलत्या युगामध्ये यांत्रिक शेती पद्धत सुरू झाली, त्यामुळे बैल पाळणाऱ्यांची संख्या ही दिवसेंदिवस कमी झाली तरी सुद्धा अजूनही हा बैल पोळा मानाचा सण ग्रामीण भागामध्ये तितक्याच उत्साहात शेतकरी बांधव साजरा करतात. बाजारपेठेमध्ये दरवर्षीपेक्षा यावर्षी काही प्रमाणात साहित्य महाग झालेले आहे, तरीपण शेतकऱ्यांचा उत्साह कमी झालेला नाही हे विशेष. युगान युगे चालत आलेली शेतकरी आणि बैल यांच्या नात्यातील सणाची परंपरा ग्रामीण भागातील शेतकरी राजा अजुनही चालू राहावी यासाठी धडपड करताना दिसत आहे.





# सावळदबारा येथे नॅशनल मराठी विद्यालयात दहीहंडी कार्यक्रम उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे नॅशनल मराठी शाळेत भगवान श्रीकृष्ण अवतार दिनाच्या निमित्ताने श्रीकृष्ण जन्मोत्सव व दहीहंडीचा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी वेशभूषण परिधान करून मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम नॅशनल मराठी शाळेच्या मैदानात दहीहंडी हा उत्सव साजरा करण्यात आला.

भगवान कृष्ण आणि दहीहंडी यांच्या प्रतिमांसह या कार्यक्रमासाठी शाळेचे मैदान सुशोभित करण्यात आले होते. विद्यार्थी यांनी राधा आणि कृष्णाची वस्त्रे परिधान केली होती. शाळेच्या मैदानात दही-हंडी बांधण्यात आली. जन्माष्टमी गाण्यांच्या तालावर विद्यार्थी आणि शिक्षकांनी नृत्य केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णावर भजनांचे सादरीकरण करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक योगेश चोपडे यांनी श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे व कृष्ण जन्माष्टमीची कथा सांगितली. भगवान श्रीकृष्णाचा जन्म मथुरेला साडेपाच हजार वर्षांपूर्वी झाला आहे. त्याची परंपरा आजही आज संपूर्ण जगात श्रीकृष्ण जन्मोत्सव व दहीहंडी उत्सव साजरा करतात, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

यावेळी रोहित आगळे यांनी विद्यार्थ्यांना गोपाळकाल्याचा प्रसाद वाटला. शौर्य चव्हाण हा कृष्ण व गोपीच्या वेषात अश्विनी चव्हाण व धनश्री चव्हाण खान मेहवश आले होते. त्यानंतर दहीहंडी फोडण्यात दहीहंडी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी विविधतेतून एकता साकारत मेहवश रहीम खान या विद्यार्थिनीने राधाची वेशभूषा परीधान केली होती. यावेळी शाळेतील शिक्षक गोतमारे, राठोड, सागरे, लखन चव्हाण, विजय चव्हाण, तडवी, विद्यार्थी व गावातील माजी सभापती शिवाआप्पा चोपडे, योगेश खैरे, अरुण नप्ते, भारत नप्ते, दिपक गावडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनोरुग्णाकडून वाहतुकीची कोंडी दूर !

## पोलीस कर्मचारी मात्र नो एन्ट्रीमध्ये आलेल्या वाहनामागे भुर्ररर!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील कमलाबाई शाळेत जवळील चौकात वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नो एंट्रीमध्ये असलेल्या वाहन चालकाची विचारपूस करत असताना तो पोवेतो एका मनोरुग्णाने चक्क हातवारे करत वाहतुकीचे कोंडी सोडवली आहे. तर वाहतुकीची कोंडी दूर करणारा मनोरुग्ण व वाहन चालकांची विचारपूस करणारा पोलीस कर्मचारी दोघेही एका जवळच असल्याने वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले होते.

धुळे शहरातील कमलाबाई शाळेजवळ मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक नियंत्रण कर्मचाऱ्यांची ड्युटी लावलेली असते मात्र अनेक वेळा नो एंट्रीमध्ये आलेल्या वाहन चालकांना अडवत वाहतूक पोलिसांकडून विचारपूस व दंड आकरला जातो तो पोवेतो वाहतुकीची कोंडी ही निर्माण होत असते कारण या ठिकाणी सिग्नल ही शोपीस ठरत असल्याचे पहावयास मिळत आहे. आज तर चक्क वाहतूक पोलीस कर्मचारी नो एन्ट्री मध्ये असलेल्या वाहन चालकांची विचारपूस करत असतानाच त्या जागेवर मनोरुग्णाने येऊन वाहतूक कोंडी दूर केल्याचे चित्र पाहायला मिळाले मात्र तोपर्यंत या वाहतूक कर्मचाऱ्याला कुठलाही भान नव्हता त्यामुळे अनेकांचे लक्ष याकडे वेधले जात होते.




# क्रिएटिव्ह नाईट चेस अकॅडमीचे ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे यांच्याहस्ते शानदार उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** बुद्धिबळ या खेळात नवनवीन तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेसोबतच कौशल्य विकसित होत आहे. त्यामुळे खेळाडूंनी अद्ययावत रहायला हवे, असे आवाहन जागतिक बुद्धिबळ खेळाडू ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे यांनी केले. बुद्धिबळ ह्या खेळाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी स्थापन केलेल्या क्रिएटिव्ह नाईट चेस अकॅडमीच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.

डोंबिवलीच्या शांतीनगरातील गजानन हाईटस् येथे आज सकाळी झालेल्या या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंडचे अध्यक्ष ॲड. संजय कागदे तसेच अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अभिषेक देशपांडे, प्रशिक्षक राकेश पवार यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. आपल्या भाषणात प्रवीण ठिपसे यांनी बुध्दीबळ खेळाडूंनी कठोर मेहनत घ्यायला हवी असे सांगून खेळाडूंचा बौध्दिक विकास करायचा असेल तसेच त्यांच्यामध्ये खेळासंबंधी आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन ठिपसे यांनी केले. याप्रसंगी बुद्धिबळ खेळातील भरीव स्वरुपाच्या योगदानाबद्दल अकॅडमी तर्फे प्रवीण ठिपसे यांचा ऐतिहासिक परंपरेचे एक प्रतिक असलेली पुणेरी पगडी, सन्मानपत्र, स्मृती चिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

अकॅडमीच्या उदघाटनाच्या निमित्ताने वेदांत बंगेरा, सोहम जमदग्नी, शर्वील गोमरे, अथर्व दामोदरे, स्वरा यादव, यश पाटील, अवनी पाटील, प्रणव ठोंबरे, नेहल राजपूत, सानवी सावंत, चिन्मय अय्यर या खेळाडूंनी बुद्धिबळ खेळात विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे यांच्या हस्ते या अकॅडमीच्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत बाळकृष्ण देशपांडे, जयश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन प्रकाश देशपांडे यांनी केले. आभार प्रशांत ओक यांनी मानले.



# सर्ज्या राजा बैल पोळा सणाचा बाजार सजला

## शेतकरी आर्थिक संकटात; बाजारात साज साहित्याची मागणी घटली; दुकान तर सजली मात्र गर्दी गायब

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**पिशोर :** शेतात वर्षभर राब-राब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या सर्जा राजाचा बैल पोळा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून शेतकरी बैलपोळा साजरा करण्यासाठी बैलासाठी लागणारे साज साहित्य घेताना सध्या आर्थिक संकटात दिसत आहे. तालुक्यातील आठवडी बाजारात रंगी बेरंगी झुल्या, गोंडे, घागरमाळ, सर, वेसनी, घाटी, शिंगाचे रंगीबेरंगी रंगाचे डबे, कासरे, कवड्याच्या माळा आदी साहित्य मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी व्यापाऱ्यांनी थाटले. परंतु शेतकरी सध्या आर्थिक कोंडीत आहे.

यावर्षी जून महिन्यात पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांनी जुलै महिन्यात खरीपाची पेरणी केली. मात्र सततच्या पावसामुळे बहुतांश शेतकऱ्यांना दुबार पेरणीला सामोरे जावे लागले असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच सततच्या पावसामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे





शेतीच्या मशागतीचा खर्च वाढल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या सगळ्या संकटाचा सामना करत असताना शेतकऱ्याला आर्थिक झळ बसली असल्याने यावर्षी पोळा सणावर शेतकरी आर्थिक संकटात दिसून येत आहे. पोळा सणानिमित्त आठवडी बाजारात बैलाचे साज साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांचा उत्साह दिसत नव्हता. शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडला आहे. आलेल्या पिकांनाही पावसाचा फटका बसत असल्याने शेतीच्या खर्चाचे नियोजन व घर खर्चाचे नियोजन कोलमडले आहे. त्यात दैनंदिन उपजिविकेसाठी लागणारे किराणा, गॅस, खाद्य तेलाची भाववाढ गेल्या वर्षापासून सतत होत असल्याने सर्वच शेतकरी महागाईने होरपळत आहे. त्यामुळे बैल पोळा याही वर्षी शेतकऱ्यांना साधेपणाने साजरा करावा लागणार आहे.

श्रावण महिन्यात केळी व किराणाची मागणी वाढली पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर बैलाचे साज खरेदी करताना शेतकऱ्यांमध्ये निरुत्साह जाणवत असला तरी किराणा खरेदीमध्ये शेतकऱ्यात उत्साह दिसत असल्याचे एका शेतकऱ्याने सांगितले. कन्नड तालुक्यात प्रमुख व्यवसाय हा शेती आहे, बहुतांश लोक शेतामधून निघणाऱ्या पिकांवर अवलंबुन आहे, मात्र कधी निसर्गाची साथ मिळत नाही तर कधी मालाला भाव मिळत नाही यामुळे शेतकरी चिंतातूर झाले आहे. मात्र ज्या लक्ष्मीच्या भरोश्या वर शेती कसली जाते त्यांचा सण उधार उसनवार करून साजरी करूया, अशी माहिती शेतकरी देत आहे.



# विनायक मेटे यांच्या अपघाताची चौकशी करा

## मराठा संघटनांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** मराठा समाजाचे नेते स्व. विनायक मेटे यांच्या अपघाताची चौकशी करण्याची मागणी मराठा संघटनांनी निवेदनाच्या माध्यमातून केली.

याबाबत सविस्तर असे की, मराठा समाजाचे नेते तथा मराठा समाजासाठी अहोरात्र झटणारे आणि आरक्षणासाठी वेळोवेळी पाठपुरावा करणारे शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष आमदार स्व. विनायकराव मेटे यांचा अपघात नसून घातपात आहे. साहेबांचा अपघात हा संशयास्पद असून त्याची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ते कारवाई करावी. त्याचबरोबर अपघात झाल्यानंतर मेटे यांना वेळेवर कोणत्याही सोयीसुविधा न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. वेळेवर सोयीसुविधा जर पुरवल्या गेल्या असत्या तर नक्कीच त्यांचा जीव वाचला असता अशा प्रकारच्या अनेक संशयामुळे त्यांचा अपघात झाला नसून त्यांचा घातपात करण्यात आला आहे, असा सूरही मराठा समाजाचा आहे. या अपघाताची योग्य ती चौकशी करून सबंधितांवर योग्य ती कारवाई करावी या आशयाचे निवेदन मराठा महासंघ, मराठा पाटील युवक समिती, शिवमुद्रा संघटना, मराठा क्रांती मोर्चा, शिवछावा संघटना व समस्त मराठा समाजाच्या वतीने आज दि.२३ ऑगस्ट २०२२ रोजी नांदुरा तहसील मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

यावेळी बाळासाहेब चांभारे पाटील, छोटू पाटील, प्रकाश खंडागळे, ज्ञानेश्वर पाटील, विजय पाटील, शंकर कोळस्कार, लक्ष्मण वक्टे, सतीश लांजुळकर, पन्ना पाटील, रामकृष्ण कुटे, निंबाजी पाटील, वैभव खराटे, शरद पाटील, अमर पाटील, भगिरथ मनस्कार, श्रीकृष्ण मनस्कार, भागवत मुंढे, राहुल मुंढे, निंबाजी बाठे, अरविंद बाठे, प्रफुल्ल बिचारे, प्रकाश खंडागळे, भगवान धांडे, संतोष डीवरे, बलदेवराव चोपडे, सलीम पेंटर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लेखी आश्वासनानंतर बुट्टेवाडगाव येथील ग्रामस्थांनी सोडले उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील बुट्टेवाडगाव येथील शाळकरी विद्यार्थ्यांनी सरपंच व ग्रामस्थ दि.२३ रोजी गंगापूर तहसील कार्यालयासमोर बुट्टेवाडगाव ते शंकरपूर या मार्गावर ४०० मीटर अतीक्रमित केलेला रस्ता मोकळा करून दया या मागणीसाठी उपोषणास बसले होते. या परिसरात ८० कुटुंब राहतात ४० ते ५० विद्यार्थी शाळेत ये जा करतात थोडाही पाऊस आला तर मातेंडी नदीतुन त्यांना तारेवरची कसरत पायपीट करावी लागते. जो पर्यंत रस्ता मोकळा करून देत नाही तो पर्यंत उपोषण सोडणार नाही अशी आग्रही मागणी केली.

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक किरण पाटील डोणगावकर यांनी उपोषण कर्त्यांची भेट घेऊन तहसिलदार यांना या प्रकरणा बाबत लक्ष घालण्याची विनंती केली पंधरा दिवसाच्या आत हा रस्ता मोकळा करून देण्याची लेखी आश्वासन तहसिलदार सतीश सोनी यांनी दिल्यानंतर सात तास चाललेले उपोषण सोडवण्यात आले.



# शिवाजी नागरी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा

आधुनिक केसरी न्यूज




**पैठण :** सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी एजाज पठाण यांनी उपस्थित सभासदांसमोर सभेचे विषय कथन केले. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात बँकेने १०३.३७ लाखाचा नफा कमविला असून ३१ मार्च अखेर बँकेचे एकूण १६५२५.०० लाख ठेवी आहेत. बँकेचा स्वनिधी १०१८.७३ लाख आहे. यावर्षी सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्यात आला. औरंगाबाद जिल्हाभरात बँकेच्या ४ शाखा कार्यान्वित असुन नवीन वर्षात ४ शाखा जिल्ह्यात उभारण्याचा मानस असून लवकरच फोन पे, पेटीयम सुविधा उपलब्ध होणार असून सभासद व ग्राहक यांच्या विश्वासार्हतेमुळे सभासदांना सतत ३२ वर्षापासून लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव अग्रगण्य बँक असल्याची ख्याती जिल्ह्यात निर्माण झाली असल्याची माहिती चेअरमन रवींद्र काळे यांनी मनोगत व्यक्त करताना दिली.

यावेळी हरिपंडीत गोसावी (व्हा.चेअरमन), संचालक भाऊसाहेब औटे, रामचंद्र काळे, पृथ्वीराज चौहान, सतिष बलदवा, शंकरराव राऊत, दशरथ सोनवणे, पाशा धांडे, अशोक जाधव, भिकाजी आठवले, सौ.ज्योती खांडेकर, सौ.तनुजा जाधव, ॲड. किशोर वैद्य, एन.व्ही. शर्मा (C.A), दत्तात्रय फटागडे, जी.व्ही. म्हस्के, संतोष राऊत, सदाविजय पोशनगिर, रत्नदिप मुळे, बाळासाहेब दसपुते, सौ.रांजनीकर, थोटे, कोरडे, चंद्रकांत परबत, आशिष पवार, फौजदार जाधव, भाऊसाहेब कणसे, आबेद पठाण व सभासद व ग्राहकांची उपस्थिती होती.

# पुणे, पिंपरी - चिंचवडमधील कलाकारांसाठी दोन रुग्णवाहिकांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एखाद्या निर्मात्याने रंगभूमी आणि चित्रपट कलाकार, तंत्रज्ञांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे हा निश्चितच चांगला उपक्रम आहे. महाराष्ट्रातील ही पहिलीच घटना आहे. कोरोनाच्या काळात कलाकार, तंत्रज्ञ यांना वेळेवर रुग्णवाहिका व औषधोपचार उपलब्ध होत नव्हते. मात्र आता कधीही रात्री अपरात्री कलाकार, तंत्रज्ञ यांना रुग्णवाहिकेची गरज पडली तर या रुग्णवाहिका मोफत उपलब्ध होणार आहेत. रंगभूमी आणि चित्रपट कलाकार, तंत्रज्ञ यांना संतोष चव्हाण यांनी उपलब्ध करून दिलेली ही सोय निश्चितच फायदेशीर ठरेल, असे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्षमेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केले. स्वर सर्वेश प्रोडक्शन आणि सर्वज्ञ नाट्य संस्था यांच्या वतीने नाट्य, चित्रपट निर्माते संतोष चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दोन रुग्णवाहिकांचे लोकार्पण मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी संतोष चव्हाण, श्रावणी चव्हाण, विनोद खेडकर, अर्जुन जाधव आणि कलाकार, तंत्रज्ञ आदी मान्यवर उपस्थित होते.




# शिक्षकपतीकडून पत्नीचा छळ; चौघाविरुध्द गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** शहरातील रहिवासी शिक्षक पतीकडून पत्नीचा छळ करण्यात येत असल्याची तक्रार पत्नीने पोलिस ठाण्यात केली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी शिक्षक पतीसह चौघाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

महिलेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार,तिचे लग्न रितीरिवाजा प्रमाणे शिक्षक शमीम अहमद तस्लीम हुसेन यांच्याशी १९९६ मध्ये झाले असून त्यांना दोन अपत्य आहेत. पती पालिकेच्या उर्दू कन्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहे. काही महिन्यांपासून पतीचे शेजारच्या महिलेसोबत अनैतिक संबंध असल्यामुळे पतीने घराकडे दुर्लक्ष केले आहे. याबाबत पतीला अनेकवेळा समजावण्यात आले. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. त्या महिलेबाबत विचारणा केली असता पतीसह सासरची मंडळी मानसिक त्रास देवून मारहाण करत आहेत. या तक्रारीवरून पोलिसांनी शिक्षक शमीम अहमद तस्लीम हुसेन, मोबीन अहमद तस्लीम हुसेन, शबाना सदफ शेख व अंजम आरा शेख नईम यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नांदगाव येथे पीक संरक्षण व खरीप पिके उत्पादन वाढ मोहिम : हेमंत देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे नांदगाव येथे कृषी सोयगाव विभागा अंतर्गत कृषी अधिकारी सोयगाव व मंडळ कृषि अधिकारी बनोटी एस. जि. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पीक संरक्षण, खरीप पिके उत्पादन वाढ मोहीम व पीएमएफ इ. कर्ज मंजूर पंधरवाडा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी कापुस पिकावरील गुलाबी बोंड आळी व्यवस्थापन, मका पिकावरील लष्करी अळी व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना बांधावर जाऊन कपाशी, मक्का या पिंकावर फवारणी कशी करायची आणि किती दिवसांनी करायची पिकाची काळजी घ्यावी तुम्हाला कोणत्या पिंकावर कोणती फवारणी करायची कृषी विभागाचा सल्ला घ्यावा जेणेकरून तुमचे नुकसान होणार नाही.



याची काळजी घ्यावी. अशा प्रकारे मार्गदर्शन केले तसेच कृषी सहाय्यक सतीश बोरसे यांनी फवारणी करताना घ्यावयाची काळजी व फवारणी किटचा वापर करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगाविषयी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला गावाचे सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पूर्णा तालुक्यात सरपंचाने केला पत्रकारावर हल्ला !

आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** ग्रामीण भागातील पत्रकारांना सर्वसामान्य जनता शेतकरी बांधवांशी बांधिलकी जोपासत जनहीतवादी पत्रकारीता करणे किती धोकादायक झाले आहे यांचा प्रत्यय पुर्णा तालुक्यातील ताडकळस पोलिस स्थानकाच्या हद्दीत असलेल्या माखणी गावातील दैनिक सामना या वृत्तपत्राचे पत्रकार जनार्धन बालासाहेब आवरगंड यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणावरून पुन्हा एकदा उजागर झाले असून माखणी गावातील ओल्या दुष्काळा संदर्भातील अहवाल निरंक असल्याचे गावातील शेतकऱ्यांना का सांगतोस असे म्हणून माखणी ग्रामपंचायतचे सरपंच गोविंद आवरगंड व सहकारी महाजन बबनराव आवरगंड या दोन आरोपीतांनी आमच्यासह गावाची बदणामी का करतोस असे म्हणून पत्रकार जनार्धन आवरगंड यांच्यावर गावातील मारोती मंदिरा समोर उभे असतांना मंगळवार दि.२३ आगस्ट २०२२ रोजी सकाळी १०-०० वाजेच्या सुमारास जोरदार हल्ला चढवून शिविगाळ करीत थापडबुक्क्यांनी मारहाण करीत जिवे मारण्याची धमकी देण्याची घटना घडली.



या संदर्भात सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ताडकळस पोलिस स्थानकाच्या हद्दीत असलेल्या माखणी गावासह संपूर्ण ताडकळस सर्कल मध्ये मागील जुलै महिण्यात सतत जोरदार पाऊस झाला यावेळी अतिवृष्टी मुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांची नासाडी झाली या संदर्भातील माखणी गावातील समितीतील सरपंच/ग्रामसेवक/तलाठी ओल्या दुष्काळा संदर्भातील अहवाल चुकीचा पाठवल्यामुळे माखणी गावातील दुष्काळा संदर्भात अहवाल निरंक आल्याची माहिती दि.२२ आगस्ट २०२२ रोजी पत्रकार जनार्धन आवरगंड यांना कृषी सहाय्यकां मार्फत कळाली त्यामुळे आपल्या गावातील शेतकऱ्यांना ओल्या दुष्काळाच्या अनुदानापासून वंचित राहावे लागेल याविषयी काहीतरी केले पाहिजे असा निर्मळ हेतू नजरेसमोर ठेवून पत्रकार जनार्धन आवरगंड यांनी सरपंच गोविंद आवरगंड यांना मोबाईल वरून व गावातील काही शेतकऱ्यांना देखील प्रत्यक्ष भेटून माहिती दिली नेमका याच गोष्टींचा राग अनावर होऊन पित्त खवळलेल्या सरपंच गोविंद आवरगंड यांनी काल दि.२३ आगस्ट २०२२ रोजी सकाळी १०-०० वाजता गावातील मारोती मंदिरा समोर धरून मारहाण करीत कुटुंबासह जिवे मारण्याची धमकी दिली या घटने संदर्भात पत्रकार जनार्धन आवरगंड यांनी ताडकळस पोलिस स्थानकात काल २३ आगस्ट २०२२ रोजी रात्री १०-०० वाजेच्या सुमारास दिलेल्या फिर्यादी वरून आरोपी सरपंच गोविंद हरिभाऊ अवरगंड व सहआरोपी महाजन बबनराव आवरगंड दोघे राहणार माखणी ता.पुर्णा यांच्या विरोधात ताडकळस पोलिस स्थानकाचे सहाय्यक पोलिस निरिक्षक विजय रामोड यांनी प्रकरणाचे गांभीर्य न ओळखता ३२३,५०४,५०६,३४ अंतर्गत किरकोळ स्वरूपाची एनसी दाखल करीत संबंधित आरोपींना वाचवण्याचे कृत्य केल्याचे निदर्शनास येत असून त्यामुळे पत्रकार जनार्धन आवरगंड यांच्यासह त्यांचे कुटुंब भयभीत झाल्याचे निदर्शनास येत असून पत्रकार आवरगंड यांनी सरपंच गोविंद आवरगंड यांच्यापासून कुटुंबाला देखील धोका असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

# रा. स्व. संघ पर्यावरण विभागाच्या वतीने कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखा नांदुराच्या पर्यावरण विभागामार्फत मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यास मुला-मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सध्या स्थितीत पर्यावरणाचा होत असलेला र्हास त्याच बरोबर प्लॅस्टिकचा दैनंदिन जीवनात वाढलेला वापर यामुळे आरोग्यावर त्याचा सर्वत्र विपरीत परिणाम आपणांस पहावयास मिळत आहे.

त्यातच काही दिवसात घराघरात व सार्वजनिक ठिकाणी प्रारंभ होणारा गणेश उत्सव यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस मातीच्या मूर्तीमुळे नदी व परिसरात पसरणारे प्रचंड प्रदूषण, या बाबीचा विचार करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखा नांदुराच्या पर्यावरण विभागामार्फत शनिवार दिनांक 20 ऑगस्ट 2022 रोजी केशव स्मृती संघ कार्यालय नांदुरा येथे मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यशाळेत पर्यावरण पूरक असलेल्या शाडू मातीची गणपतीची मूर्ती बनवायचे प्रशिक्षण देण्यात आले या कार्यशाळेत बाल व किशोरवयीन मुला-मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 145 बाल किशोरवयीन मुला-मुलींनी आपल्या पाल्यासह अत्यंत



आनंदमय व उत्साहवर्धक वातावरणात आपला सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून खामगाव येथील पर्यावरण प्रेमी ॲडव्होकेट सौरभ जयस्वाल व नांदुरा येथील प्रशांतजी सावकारे यांनी आपले योगदान दिले कार्यशाळेत उपस्थित मुला-मुलींनी श्री गणपतीची मूर्ती कशी बनवायची ? याचे प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी मुला मुलींनी स्वतः आपल्या हातांनी शाडू मातीची श्री गणेशजी ची मूर्ती बनविली आणि हीच मूर्ती आता सर्व सहभागी आपल्या घरी, गणेशोत्सव काळात स्थापित करून विधिवत पूजा अर्चा करतील. व यानिमित्त एक पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजाला देऊन इतरांना या कार्यात उपकृत करणार आहेत. कार्यशाळेचे आयोजक म्हणून रा स्व संघाचे नगर पर्यावरण संयोजक पियुष राकेश मिहानी यांनी काम सांभाळले. नगर कार्यवाह श्रीपाद सराफ व सहकार्यवाह अमित ठाकूर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी यानिमित्त परिश्रम घेतले.

# बालानगर येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** पैठण तालुक्यातील बालानगर येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात गणेश उत्सव व पोळा सणानिमित्त एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व सरपंच वंदना भालेकर यांच्या उपस्थितीत शांतता कमिटीचे बैठक पार पडली या वेळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी सांगितले की गणेश उत्सव व पोळा मोठया उत्साहात साजरा करावे. सर्व गणेश मंडळांनी साउंड आवाजाची मर्यादा पाळावी.व वॉटरप्रूफ मंडप तयार करावे. धार्मिक स्थळांना गालबोट लागणार नाही याची दक्षता घ्यावी. यावेळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे. एक फौजदार नामदेव कातडे. इस कॉन्स्टेबल उघडे. गुंडेकर. सोपान भालेकर ग्रामपंचायत सदस्य रवींद्र भुजबळ. पांडुरंग वीर. सोमनाथ भालेकर भास्कर गोरडे. आयुब मौलाना. आयुब शेख.हरून शेख. पोलीस पाटील आप्पासाहेब गोरडे. कृष्णा गोरडे. विठ्ठल ताकवले यांच्या सर्व गणेश मंडळाचे सदस्य हजार होते.


# शांततेचा वारसा जतन करण्यासाठी प्रयत्न व्हावेत

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे पोलीस स्टेशन फर्दापूर अंतर्गत डॉ. विजयकुमार मराठे उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग सिल्लोड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.२४/८/२२ बुधवार रोजी चला संकल्प करुया"एक गाव एक गणपती"व पोळा निमित्ताने शांतता कमेटीची बैठक घेण्यात आली याप्रसंगी प्रमुख पाहूणे रमेश जसवंत तहसीलदार सोयगाव यांच्या उपस्थितीत चला संकल्प करुया"एक गाव एक गणपती"या बद्दल शांतता कमेटीची बैठक संपन्न झाली. या शांतता कमेटीची बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले. गणेशोत्सव काळात फर्दापूर,सोयगाव व सावळदबारा परिसरातील सर्व जाती धर्मातील नागरिकांनी एकत्रित येऊन गावात शांततेचा वारसा जतन करण्यासाठी प्रयत्न व्हावेत असे आवाहन सपोनि देवीदास वाघमोडे यांनी फर्दापूर येथील कार्यक्रमात यांनी केले. आगामी काळात पोळा व गणेशोत्सवाचे औचित्य साधुन फर्दापूर गावाच्या पोलीस स्टेशनच्या वतीने कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शांतता समितीच्या बैठकीत डॉ. विजयकुमार मराठे उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब यांनी ग्रामस्थ व सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी यानां मार्गदर्शन केले.

### सपोनि देवीदास वाघमोडे यांचे प्रतिपादन



डॉ. विजयकुमार मराठे पुढे म्हणाले की,पोळा, गणेशोत्सव साजरा होत असताना कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. सर्वांनी समाजून घ्यावे.प्रबोधन पर देखावे सादर करून गावाच्या व परिसरात शांततेचा वारसा जतन करण्याचा प्रयत्न करावा,आणि कायदाच्या नियमांचे उल्लंघन करु नका.असे उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी आयोजित कार्यक्रमात सांगितले.यांच्यासह गावातील विविध स्तरातील मान्यवरांनी मौलिक सूचना केल्या.शांतता कमेटीची बैठकीस सर्व पोलीस अधिकारी,उपनिरीक्षक अधिकारी,पोलीस कर्मचारी, सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बंन्धू, तहसील कार्यालयाचे तहसीलदार रमेश जसवंत,महावितरणचे उपकार्यकारी अभियंता निरज बिदे व मान्यवर,गणेश मंडळाचे सदस्य,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचनाम्यासाठी 'जनशक्ती'चे कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात मागील वर्षी सन २०२१ मध्ये कन्नड तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी पिके हाती येतील का नाही, या भीतीपोटी पीक विमा भरल्याचे कृषी विभागाच्या निरीक्षणावरून दिसून आले होते मागील वर्षी पीक विमा भरलेल्या कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांना १७ कोटी रुपये पीक विमा मिळाल्याने या वर्षी ९२ हजार ४६ शेतकऱ्यांनी विमा काढला आहे. या वर्षी काही भागात पावसाचे प्रमाण जास्त झाल्यामुळे ५० टक्के पिके हातातून गेली आहेत.

व तालुक्यात काही ठिकाणी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी पिक विमा काढलेला आहे त्यांच्या झालेल्या नुकसानाचे तात्काळ शासनाने व संबंधित कार्यालयाने पंचनामे करावेत अशी मागणी आता कन्नड तालुक्यातील शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.



तसेच शेतकऱ्यांच्या या प्रश्नासंदर्भात तालुक्यातील जनशक्ती संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुद्धा कन्नड तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक यांना तात्काळ पिकाचे पंचनामे करण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले.




काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हार्मोन्स - पुरुष आणि स्त्री...

आधुनिक केसरी

A. सेक्स ड्राईव्ह कमी होणे, B.ई.डी. इंपोटन्स, C. ब्रेस्ट साईज वाढणे, D.लो स्पर्म काऊंट, E. हॉट फ्लॅशेस, F. डिप्रेशन, अस्वस्थता, G. टेस्टीज लहान होणे, H. केस गळणे, I. हाडे ठिसूळ होणे.

**स्त्री आणि पुषषांमध्ये कोणते हार्मोन्स असतात?**

**1) प्रोलॅक्टिन :** हे हार्मोन पिट्युटरी ग्लँडमध्ये तयार होते प्रसूतीनंतर बाळाला स्तनपानासाठी दूध निर्मिती होण्यासाठी हे हार्मोन महत्त्वाचे आहे. प्रोलॅक्टिनचे काम काय ? असे म्हटलं तर , FSH ला (फॉलिकल स्टिम्युटेटिंग हार्मोनला) हे विरोध करते तसेच GNRH (गोनॅडॉट्रॉपीन रिलीजींग हार्मोन) याला देखील ते विरोध करते. जे की बीजांड तयार करण्याचे मुख्य काम करतात. पुरुषांमध्ये हे काम करते यावर सध्या संशोधन सुरू आहे मात्र नक्कीच याचा संबंध हा वंध्यत्वाशी आहे. हाय प्रोलॅक्टिन लेव्हल ही पिट्युटरी ट्यूमर, लिव्हर, किडनी, PCOD व हायपो थायरॉइडिझम यामध्ये आढळते.

**2) फॉलिकल स्टिम्युलेटिंग हार्मोन :** अंडाशय व बीजांडांची वाढ या हार्मोन मुळे होते. पुरुषांमध्ये शुक्राणू तयार करण्यासाठीदेखील हे हार्मोन कामी येते.FSH पिट्युटरी ग्रंथीमध्ये बनते आणि बीजांड व अंडी तयार होते.

**3) प्रोजेस्टेरॉन :** मासिक पाळी येणे व गर्भधारणा होणे या क्रियांमध्ये हे हार्मोन महत्त्वाचे आहे. इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉन दोन्ही एकत्र देतात जेणेकरून इतर दुष्परिणाम टाळता येतात.

**4) गोनॅडोट्रॉपिन्स :** ल्युटिनायझिंग हार्मोन (एल एच ) व एफ एस एच याला गोनॅडोट्रॉपिन्स म्हणतात. स्त्री आणि पुरुषांमध्ये टेस्टीज व ओव्हरीजला स्टिम्युलेट करण्याचे काम गोनॅडोट्रॉपिन्स करतात. तसेच हे पिट्युटरी ग्रंथी (ॲाटरिअर) तयार करते. आता हे जे एल. एच. (ल्युटिनायझिंग हार्मोन) आहेत ते स्त्री आणि पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन आणि इस्ट्रोजन तयार करतात. बीजांड फुटताना एल. एच. वाढतं याला प्रीओव्हयुलेटरी एल.एच. सर्ज असं म्हणतात. प्रोजेस्टेरॉन, इस्ट्रॅडीऑल हे ल्युटिनायझेशन ऑफ ओव्हरियन फॉलिकल (LHRH) हे हायपोथेलामस (ब्रेन) मध्ये तयार होते. **(क्रमश)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858

Email : drvijaydahiphale@gmail.com,

Website : www.dahiphalecosmeticurology.com